

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकःबाळासाहेब मस्के



बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

# चिटकून बसलेले 'खटमल' गरिबाच रक्त पिऊ लागले!

प्रकल्प संचालक पाटील यांची मेहरबानी? | पैसे टेकविले तरंच घरकुल मार्ग मोकळा होतो! | ढीगभर तक्रारी तरीही कारवाई का होत नाही? | सीईओ, बेशिस्त लोकांना तुमचा दणका दाखवाच

## इंजि राहुल देवडकरसह इतरांना हाकलून द्या?



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील पंचायत समितीच्या अनेक तक्रारी आहेत.मात्र त्या तक्रारींची दखल घेतली जात नाही. त्यामुळे सामान्य नागरिकांची कामेही वेळेत होत नाहीत. तसेच योजनांच्या कामात चिरीमिरी घेतल्याशिवाय फाईल पुढे सरकत नाही. प्रशासक लागलेला असल्याने सर्वांचचं फावत आहे. त्यामध्ये कंत्राटी अभियंता अक्षरशः गरिबांचं रक्त पिऊ लागले आहेत.एकाच जागी खटमल सारखे चिटकून बसल्याने कोणालाही जुमानत नाहीत.त्यामुळे राहुल देवडकरसह अन्य कंत्राटी अभियंत्यांना हाकलून देण्याच्या तक्रारी असून देखील जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक संगिता पाटील एवढ्या महेरबान का? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

बीड पंचायत समिती नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. सरकारी योजनांच्या कामात अनियमितता, बोगसगिरी, खाऊगिरी, अशा अनेक उच्चांकाने पंचायत समिती पोखरुन गेली आहे. त्यामध्ये कंत्राटी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदाच्या लोकांची आणखीन भर पडली आहे.त्यामुळे सगळे मिळून-मिसळून पद्धतशीरपणे योजनांच्या कामात डल्ला मारत आहेत. अशा अनेक तक्रारी बीड पंचायत समितीत पडून आहेत.बीड पंचायत समितीत कंत्राटी इंजि राहुल देवडकरसह अन्य अभियंता गेल्या काही वर्षापासून एकाच जागेवर आहेत.त्यांची बदली करावी, अशा तक्रारी आहेत. परंतू त्यांना अद्यापही हाकलून देण्यात आलेले नाही.जिल्हा ग्रामिण यंत्रणेच्या प्रकल्प संचालक संगिता पाटील यांनी, संबंधित अभियंत्यांची तातडीने बदल्या करण्यात याव्यात, अशी मागणी असूनही बदली होत नाही. त्यामुळे संगिता पाटील यांच्या कामकाजावरही सवाल उपस्थित होत आहेत. बीड पंचायत समितीमध्ये कंत्राटी पदावर कार्यरत पान २ वर...

### संपर्क झाला नाही...

कंत्राटी अभियंता संदर्भात, जिल्हा ग्रामिण यंत्रणेच्या प्रकल्प संचालक संगिता पाटील यांना, दूरध्वनीद्वारे संपर्क करण्यात आला होता. परंतू त्यांचा संपर्क होवू शकला नाही. त्यामुळे कंत्राटी अभियंता यांची बदली की, हकालपट्टी ही बाब समजू शकलेली नाही.

### सीईओ काय म्हणाले...

बीड पंचायत समितीमध्ये कंत्राटी अभियंता पदावर कार्यकरत असलेल्या लोकांच्या बदली बाबतीत जिल्हा परिषद सीईओ यांना, विचारणा करण्यात आली होती. परंतू सीईओ आदित्य जीवने म्हणाले की, जिल्हा ग्रामिण यंत्रणा प्रकल्प संचालक संगिता पाटील यांच्याशी संपर्क साधावा असं उत्तर त्यांनी दिल.

### कधीही यावे अन् कधीही जावे

बीड पंचायत समितीच्या कंत्राटी अभियंत्यांना कसल्याही वेळेचे बंधन नाही. कधीही या आणि कधीही निघून जा, आपलेच राज्य आहे.त्यामुळे अशा कामचूकार लोकांना जिल्हा परिषद सीईओ आदित्य जीवने यांनी फैलावर घेवून कारवाईचा बडगा उगारावा असा सवाल नागरिकांतून उपस्थित होतो आहे.

## परळीतील व्यापारी बांधवांचा हक्क

धनंजय मुंडे:परळीत व्यापारी स्नेह मिलन



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी स्वर्गीय पंडित अण्णा मुंडे हे परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती असताना त्यांनी बाजार समितीच्या नावे विकत घेतलेल्या १०० एकर जमिनीवर परळीतील व्यापारी बांधवांचा हक्क आहे, व्यापारपेठेची वृद्धी करताना ही जमीन अत्यंत अल्प दरात व्यापारी बांधवांसाठी उपलब्ध करून देणार असल्याचे मत कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी परळीत बोलताना व्यक्त केले आहे.मंगळवारी सायंकाळी धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत परळी तालुक्यातील व्यापारी बांधवांचा दीपावली निमित्त स्नेह मिलन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्या कार्यक्रमात धनंजय मुंडे बोलत होते.

काहीजण जाणीवपूर्वक परळीत दहशत दादागिरी म्हणून, व्यापाऱ्यांना अडचण म्हणून नेहमीच परळीची बदनामी करत आहेत. मात्र पान २ वर...

### ...तर माझ्या जागेत मेडिकल कॉलेज

माझ्या घराजवळ १६ एकर जागा शिल्लक आहे त्यापैकी १५ एकर जागा देतो कोणीही वैद्यकीय क्षेत्रातील मोठ्या व्यक्तीने पुढे यावे त्यांना ट्रस्ट तयार करून त्या ठिकाणी मेडिकल कॉलेज व सर्व अध्ययवत वैद्यकीय सुविधा असलेले रुग्णालय सुरू करून देतो. त्यासाठी लागणारे अर्थसहाय्यही कर्ज स्वरूपात उपलब्ध करून देतो. मला त्यातून एक रुपयाच्या कमाईची अपेक्षा नाही अट फक्त एकच आहे की त्या रुग्णालयात परळी मतदारसंघातील गोरगरिबांची मोफत उपचारांची सुविधा झाली पाहिजे तसेच मेडिकल कॉलेजमध्ये मतदारसंघातील पात्र विद्यार्थ्यांना अत्यंत अल्प दरात प्रवेश मिळाला पाहिजे, असेही धनंजय मुंडे यांनी सांगितले.

## अपक्ष असलेल्या दादांकडे प्रवेशाची रीघ!

पक्षांतर: क्षीरसागरांचे असंख्य कार्यकर्ते अनिल जगतापांच्या सोबतीला




बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

निवडणूक प्रचाराचा नारळ फुटण्याअगोदरच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे उमेदवार तथा विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर यांना बीड मतदार संघातील माळस जवळा गावच्या शेकडो कार्यकर्त्यांनी सोडचिट्टी देत बीड विधानसभा अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांच्याकडे जाहीर प्रवेश केला आहे. अनिलदादा जगताप हे तळागाळातील माणसांची जाण लोकप्रिय नेते आहेत. बीड विकासाची धुरा अनिलदादा यांच्या हाती आल्यास ते बीड विकासाचा कायापालट करतील. असा विश्वास व्यक्त करत बीड मतदार संघातील माळस जवळा गावच्या अविनाश पाटोळे ग्रामपंचायत सदस्य माळस जवळा, सचिन पाटोळे, दत्ता पाटोळे, अभिषेक पाटोळे, अरविंद पाटोळे, करण पाटोळे, केशव पाटोळे, योगेश पाटोळे, आकाश गवळी, आकाश सोनवणे, अशोक लोखंडे, रणजित पाटोळे, नागेश पाटोळे, शहादेव पाटोळे, रमेश पाटोळे, रवींद्र पाटोळे, महादेव पाटोळे, गणेश पाटोळे, दिलीप पाटोळे यांच्यासह शेकडो पाटोळे मित्रपरिवाराने अनिलदादा जगताप यांच्याकडे काल दि. ६ नोव्हेंबर रोजी रात्री ८.०० वाजताच्या दरम्यान जाहीर प्रवेश करत पान २ वर...

## जगातली पहिली 'विश्वसुंदरी' काळाच्या पडद्याआड!

दुःखद: किकी हॅकन्सन यांचं ९५ व्या वर्षी निधन



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

विश्वसुंदरी हा किताब पहिल्यांदा मिळवणाऱ्या किकी हॅकन्सन यांचं वयाच्या ९५ व्या वर्षी निधन झालं आहे. १९५१ मध्ये किकी हॅकन्सन यांच्या डोक्यावर विश्वसुंदरी या बिरुदाचा मुकुट ठेवण्यात आला होता. जगातल्या पहिल्या विश्वसुंदरीने आज जगाचा निरोप घेतला आहे. कॅलिफोर्निया या त्यांच्या घरात त्यांनी अखेरचा श्वास घेतला.किकी हॅकन्सन ( ऋळीीं चळी थीश्रव ) यांचा मृत्यू झोपेतच झाला. त्या त्यांच्या पान २ वर...

## योगी सरकारला सर्वोच्च न्यायालयाने फटकारलं

निर्णय : २५ लाखांच्या भरपाईचे आदेश



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

उत्तर प्रदेशातील महाराजगंज जिल्ह्यात काही दिवसांपूर्वी एका निवासी घरावर आणि दुकानावर बुलडोझर चालवत कारवाई करण्यात आली होती. या कारवाईनंतर उत्तर प्रदेश सरकारवर अनेकांनी टीकेची झोड उठवली होती. त्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेलं होतं. आता या प्रकरणावरील सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारला चांगलंच फटकारलं आहे. एवढंच नाही तर घर पाडल्याबद्दल उत्तर प्रदेश सरकारला २५ लाख रुपयांची नुकसान भरपाईचे देण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. तसेच घरावर बुलडोझर कारवाई केल्यामुळे हा अधर्म आहे, अशी टिप्पणी देखील यावेळी न्यायालयाने केली.सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश पान २ वर...

राजकारण | धनंजय मुंडेंच्या विधानाचा रोख कुणाकडे?

## माझा राजकीय अस्त करण्याची व्यूहरचना

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यात विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. राजकीय पक्षांकडून निवडणुकीचा प्रचार जोरात सुरु आहे. राज्यभरात वेगवेगळ्या मतदारसंघात युती आणि आघाडीसह इतर पक्षांच्या नेत्यांच्या सभांचा धडाका सुरु आहे. या विधानसभेच्या निवडणुकीत महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी लढत पाहायला मिळणार आहे. सध्या सुरु असलेल्या प्रचाराच्या सभेंच्या माध्यमातून विरोधी पक्षातील नेते सत्ताधाऱ्यांवर आणि सत्ताधारी पक्षातील नेते विरोधी पक्षांतील नेत्यांवर टीका करताना पाहायला मिळत आहेत. त्यामुळे राज्याचं राजकारण चांगलंच तापलं आहे.



### धनंजय मुंडे काय म्हणाले?

हे सर्व कशासाठी सुरु आहे? का माझी एवढी भिती आहे? त्यांना का वाटतं की महाराष्ट्रामध्ये काम करणारा व्यक्ती उद्या अडचणीचा ठरू शकतो. त्यामुळे आता व्यूहरचना करून राजकीय अस्त करा. पण ही भीती धनंजय मुंडेंची नाही तर ही भीती जनतेने माझ्यावर टाकलेल्या विश्वासाच्या ताकदीची आहे. अशीच ताकद तुम्ही येणाऱ्या पाच वर्षांत द्या आणि आशीर्वाद द्या. पण मला असा आशीर्वाद नको, तर परळी विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक विजयाचा आशीर्वाद हवा आहे, असं धनंजय मुंडे यांनी म्हटलं आहे.

यातच आज राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते, मंत्री धनंजय मुंडे यांनी देखील परळी विधानसभा मतदारसंघात सभांचा धडाका लावला आहे. आज झालेल्या एका सभेत बोलताना धनंजय मुंडे यांनी केलेल्या एका विधानाची चर्चा रंगली आहे. माझा राजकीय अस्त करण्याची व्यूहरचना सुरु आहे, असं धनंजय मुंडेंनी म्हटलं आहे. त्यामुळे त्यांच्या या विधानाचा रोख नेमकी कुणाकडे होता? याबाबत आता चर्चा रंगल्या पान २ वर...

## सर्वोच्च न्यायालयाकडून अजित पवारांना आदेश

याचिका:पक्षचिन्हाबाबत दिला ३६ तासांचा अल्टिमेटम!



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यात विधानसभा निवडणुकीची धामधुमी सुरू आहे. परंतु, दोन पक्षात झालेल्या बंडखोरीमुळे पक्षचिन्हावरून वाद सुरू आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने घड्याळ चिन्हाच्या गैरवापराबाबत सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. यावरून आता सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला येत्या ३६ तासांत अस्वीकरण पत्रक प्रसिद्ध करण्याचे आदेश दिले आहेत. लाईव्ह लॉने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (राष्ट्रवादी) अध्यक्ष अजित पवार यांनी बुधवारी ६ नोव्हेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयाला आश्वासन दिले की ३६ तासांच्या आत मराठी दैनिकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने घड्याळ चिन्हाबाबत अस्वीकरण प्रसिद्ध केले जाईल. घड्याळ चिन्हाबाबत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे, निवडणुकीच्या काळात न्यायप्रविष्ट असलेलं घड्याळ चिन्ह वापरलं जात आहे, असं या अस्वीकरण पान २ वर...

## मदरसे ‘कबूल’

उत्तर प्रदेश सरकारचा मदरसा शिक्षण सुधारणा कायदा सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी वैध ठरवला ही घटना वैधानिक तसेच राजकीयदृष्ट्याही महत्त्वपूर्ण ठरते. मदरसा या इस्लामचे धार्मिक शिक्षण देणाऱ्या संस्था. त्यातून दिले जाणारे शिक्षण कालबाह्य असते आणि त्यातून फक्त धर्मांध तयार होतात असे मानणे हा अलीकडे बहुसंख्याकांतील एका वर्गाचा छंद झालेला आहे. वास्तविक शिक्षण आणि धर्मांधता यांचा संबंध असतोच असे नाही. अमेरिकेत ९/११ चा उत्पात घडवून आणणाऱ्या अतिरेक्यांतील एक तर थेट उच्च गुणवत्तेसाठी विख्यात पाश्चात्त्य अर्थशास्त्र संस्थेचा विद्यार्थी होता. तरीही त्यास दहशतवादी हल्ल्यात सहभागी व्हावे असे वाटले. उच्च शिक्षितांतील अनेक वैचारिकदृष्ट्या किती कट्टर धर्माभिमानी असतात याची कित्येक उदाहरणे अन्य धर्मीयांतही आढळतात. तेव्हा काही विशिष्ट शिक्षण देणाऱ्या संस्थांतील विद्यार्थी हे धर्मातिरेकी विचारांचे असतात, असे मानणे हे सध्याचे सोयीचे धर्मकारी राजकारण ठरते. आणि तसे पाहू गेल्यास सर्वच धर्मशिक्षण कालबाह्य असेही म्हणता येईल. तेव्हा कालबाह्यतेसाठी एकाच धर्माची निवड करणे अयोग्य. हा विचार करून उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री मुलायमसिंह यादव यांनी २००४ साली मदरसा शिक्षण सुधारणा क़ायदा आणला आणि त्यासाठी एका स्वतंत्र मंडळास या शिक्षणातील सुधारणा अमलात आणण्याचे अधिकार दिले. आपल्या राज्यातील मदरशांतून जे शिक्षण दिले जाते त्यात कालसापेक्षता असावी हा त्यामागील विचार. तथापि त्यास न्यायालयात आव्हान दिले गेले. जवळपास दोन दशकांनंतर याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने अंतिम निवाडा दिला. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. मनोज मिश्रा आणि न्या. जे. बी. पारडीवाला यांच्या पीठाने हा दूरगामी निवाडा केला. त्याचे महत्त्व समजून घेणे आवश्यक ठरते.याचे कारण अलाहाबाद उच्च न्यायालयाने याप्रकरणी दिलेला निकाल. उत्तर प्रदेश सरकारच्या २००४ सालच्या या निर्णयास अलाहाबाद उच्च न्यायालयात आव्हान देताना संबंधितांनी राज्य सरकारच्या अधिकाराचा तसेच धर्मनिरपेक्षतेचा मुद्दा उपस्थित केला. मदरसा या धर्मशिक्षण देणाऱ्या संस्था. त्यात हस्तक्षेप करण्याचा अधिकारच मुळात राज्य सरकारला नाही, असा युक्तिवाद या संदर्भात केला गेला आणि असा हस्तक्षेप झाल्याने धर्मनिरपेक्षतेस बाधा येते असे सांगितले गेले. त्याआधीच्या काळात उत्तर प्रदेशात सत्तांतर झाले आणि मायावती, अखिलेश यांच्यानंतर योगी आदित्यनाथ यांच्याकडे मुख्यमंत्रीपद आले. मदरसा या व्यवस्थेस प्रतिकूल परिस्थिती निर्माण होऊ लागली ती त्यानंतर. योगी यांचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांच्या राजकीय पक्षाचे चारित्र्य लक्षात घेता तसे होणे नैसर्गिक. तेव्हा मुलायमसिंह यांच्या निर्णयास न्यायालयात आव्हान दिले जाणेही नैसर्गिक. अलाहाबाद उच्च न्यायालयात त्याचा निकाल यंदा काही महिन्यांपूर्वी लागला. त्या निकालात अलाहाबाद उच्च न्यायालयाने मुलायमसिंह सरकारचा हा कायदा रद्द केला. उत्तर प्रदेशात त्यावेळी जवळपास १६ हजार अधिकृत मदरसे आणि त्याच्या निम्मे अनधिकृत मदरसे होते. या मदरशांच्या शिक्षण व्यवस्थेचे संचालन करणाऱ्या मंडळाकडे या मदरशांचे नियमन. या मदरशांवर जवळपास ९०० कोटी रुपये खर्च केले जातात. न्यायालयात हा सारा तपशील दिला गेला.वास्तविक या मदरशांची अवस्था आणि त्यातून दिले जाणारे शिक्षण यात सुधारणांची निश्चित गरज आहे, यात शंका नाही. पण या सुधारणांची सुरी शल्यकाच्या सुरीप्रमाणे चालायला हवी. खाटकाहाती असणाऱ्या सुऱ्याप्रमाणे नव्हे. तो उद्देश मुलायमसिंह यांच्या कायद्यामागे होता. राजकारणाने त्यावर मात केली. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाने हा कायदा उत्तर प्रदेश सरकारला ‘कबूल’ करून घ्यावा लागेल.

# मेहकर-लोणार अपक्ष लढण्यास माघार का?

## चर्चा:डॉ.गोपाल बछिरेंची विधानसभेत माघार

लोणार/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार ६ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछीरे यांनी मेहकर लोणार विधानसभा अपक्ष लढण्यात माघार का घेतली.

शिवसेना फूटी नंतर मेहकर विधानसभा मतदारसंघ चे आमदार व बुलढाण्याचे खासदार हे शिंदे गटात गेले त्यांच्याबरोबर संपूर्ण जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका, ग्रामपंचायत यांचे सदस्य व पदाधिकारी हे सुद्धा शिंदे गटात सामील झाले, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत बोटावर मोजण्याइतकेच पदाधिकारी बुलढाणा जिल्ह्यात शिल्लक राहिले त्यापैकी प्रा. नरेंद्र खेडेकर, जालिंदर बुधवत, नंदकुमार कराडे, आशिष रहाटे, लिंबाजी पांडव, किशोर गारोळे, गजानन जाधव, एड दीपक मपारी लूकमान कुरेशी, श्रीकांत मादनकर, तानाजी मापरी, इकबाल कुरेशी यांच्यासारखे निष्ठावंत उद्धव साहेबांसोबत खंबीरपणे उभे राहिले या मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघात संघटन पुनर्बांधणीचे काम डॉ. बछिरे यांनी जोमाने सुरू केले विद्यापीठ



प्राध्यापकाच्या नोकरीची स्वेच्छा निवृत्ती घेऊन पूर्णवेळ संघटन बांधणीत व सर्वसामान्यांचे मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी अनेक आंदोलने मोर्चे उपोषणे करून सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यात घातला पाच वर्षापासून पुरातत्त्व विभागाने स्नानासाठी बंदी घातलेली धारतीर्थ आंदोलन करून सुरू केले परंतु याचे श्रेय डॉ. बछीरे यांना मिळू नये म्हणून ते पुन्हा बंद पाडले अशा अनेक आंदोलने करून व पक्ष संघटन बांधणीतून डॉ. बछिरे यांची मतदार संघातील शेवटच्या माणसापर्यंत, शिवसेना म्हणजे गोपाल बछिरे व मशाल म्हणजे गोपाल बछिरे ही ओळख निर्माण झाली. मेहकर विधानसभेचे शिवसेनेचे तिकीट गोपाल बछीरे यांनाच मिळणार व तेच निवडून येणार हा विश्वास सर्वांच्या मनात निर्माण झाला होता, परंतु काही चक्रे फिरली आणि सदरील विधानसभेचे तिकीट सिद्धार्थ खरात यांना मिळाले यावर मतदारसंघातील सामाजिक नेते, शिवसेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक यांनी डॉ. बछिरे यांना अपक्ष उमेदवारी अर्ज भरण्याचा आग्रह धरला आणि बछीरे यांनी भरलाही व अपक्ष राहून निवडून येणार हा विश्वासही निर्माण झाला होता परंतु डॉ. बछीरे यांनी अर्ज मागे घ्यावा म्हणून शिवसेनेचे सचिव व नेते विनायक राऊत, अनिल देसाई, भास्करराव जाधव, यांनी त्यांचे मन वळवण्याचा प्रयत्न केला परंतु यश आले नाही शेवटी चार नोव्हेंबरला दुपारी दोन वाजता उद्धव साहेबांचा फोन आला व त्यांनी डॉ. बछीरे यांच्या कामाचे कौतुक करून भविष्यात आपणास न्याय दिला जाईल असे आपण अर्ज मागे घ्यावा असे सूचित केले, मातोश्रीला पंढरी व उद्धव साहेबांना पांडुरंग मानणारा गोपाल बछिरे यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला व संपूर्ण ताकतीने सिद्धार्थ खरात यांना निवडून आणण्यासाठी ते प्रयत्न करत आहेत.

## पान एक वरून

**चिटकून बसलेले ‘खटमल’**

असलेले इंजि राहुल देवडकर तसेच अन्य अभियंता सर्वजन मिळून हवा तसा कारभार चालवित आहेत. यांच्याकडे ग्रामिण गृह निर्माण विभाग असल्याने घरकूल योजनेत पैसे उखळल्या बिगर बांधकाम पुढे जात नाही. त्यामुळे सामान्य गरीब लाभार्थींना तोटा सहन करावा लागतो आहे.त्यामुळे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जातीने लक्ष देवून प्रत्येकाला ज्याची-त्याची जागा दाखवून बीड पंचायत समितीचा कारभार सुरुळीत करावा. अशी मागणी होऊ लागली आहे.

**परळीतील व्यापारी बांधवांचा**

खरोखर परळीत व्यवसाय करणाऱ्या लहानात लहान व्यापाऱ्यापासून ते मोठ्या व्यवसायिकांपर्यंत कुणालाही कधीही जाऊन भेटा आणि विचारा मी किंवा माझ्या सहकाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारचा त्रास त्यांना आहे का? मी परळीत मोठ मोठे महोत्सव घेतले माझ्या नाद प्रतिष्ठानच्या माध्यमातून त्याचा खर्च केला परंतु परळीतील एकाही व्यावसायिक बांधवांकडून कधी एक रुपया सुद्धा वर्गणी मागितलेली नाही असेही यावेळी धनंजय मुंडे यांनी बोलताना स्पष्ट केले. सिरसाळा येथे २२०० एकर जागेमध्ये एमआयडीसी उभारण्यास मंजुरी मिळाली आहे त्यापैकी ७८ हेक्टर जमीन अधिग्रहण करण्यात आली असून या भागात उद्योग उभारणीसाठी पोषक पूरक सुविधा उपलब्ध केल्या जातील. तसेच इथे येणाऱ्या उद्योजकांना अत्यंत स्वस्त दरात ही जमीन उपलब्ध करून द्यावी लागेल तेव्हाच मोठे उद्योग या ठिकाणी आकर्षित होतील. आगामी काळात हे देखील पूर्ण करून आंबेजोगाई, परळी, शिरसाळा ते दिंद्रुड पर्यंत उद्योगांचे जाळे उभे राहील असा व्यापार व उद्योग क्षेत्रात भरारी घेण्याचा मानस असून त्या दृष्टीने मी नियोजन करत आहे असेही धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले. मला स्वतःला कोणताही उद्योग व्यवसाय करण्यात किंवा संस्था उभारण्यात रस नाही, मलनाथपूर भिलेगाव परिसरात २५० एकर जमिनीवर शापूरजी पालनजी या सुप्रसिद्ध कंपनीला सोलार पार्क उभा करून दिला त्या ठिकाणी हजारावर रोजगारांची निर्मिती ही झाली आणि ८० मेगावाट २१ निर्मिती केली जात आहे. २००६-७ सालापासून न्यायालयीन लढा देऊन इंडिया सिमेंट फॅक्टरी परळीत उभी केली, पुढे अल्ट्राटेक कंपनी सुद्धा आता परळीत ६०० कोटींची गुंतवणूक करण्यास मान्य झाले असून तसा करारही करण्यात आला आहे. मात्र हे सगळे आपल्या विरोधकांना दिसणार नाही. फक्त परळीची आणि परळीच्या मातीची बदनामी करण्याचा एक कलमी कार्यक्रम त्यांचा आहे. त्यांना आता आपण सर्व परळीकरांनी मिळून धडा शिकवला पाहिजे, असेही पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले.या स्नेह मेळाव्यास कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, प्रा. मधुकर आघाव, माऊली तात्या गडदे, जयपाल लाहोटी, मनीष झंवर, सतीश करमाळकर, सुशील डुबे, गोल्डीशेठ भाटिया, जगदीश चौधरी, अंबादास सुगावे, तसेच माऊली दादा फड, विजय सामत, शांतीलाल जैन, संदीप लाहोटी, बंडूशेठ गरुड, देवसटवार काका, विनोद शेठ सामत, नंदकिशोर विभा, सुभाष शेठ तोतला, पांडुरंग लाहोटी, गुलाबराव शेटे, विजय वाकेकर, अशोक कांकरिया, अनिल तांदळे, रतन कोठारी, राजगोपाल बंग, केदार सारडा, संजय दरक, सुनील कोटेचा, नवरतन शर्मा, लक्ष्मण मुंडे यांसह परळी शहर व तालुक्यातील व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**अपक्ष असलेल्या दादांकडे**

त्यांच्या विजयासाठी वज्रमुठ आवळली आहे. अनिलदादा जगताप यांनी सर्व तरुणांचे सहर्ष स्वागत करत त्यांचा स्वतःकडे प्रवेश करून घेतला. दरम्यान अनिलदादा जगताप यांनी माळस जवळा येथील तरुणाईचे साथ विधानसभा निवडणुकीत मोलाची भूमिका बाजावेल असा विश्वास व्यक्त केला. निवडणूक प्रचाराचा नारळ फुटण्याअगोदर बीडच्या तरुणाईची इन्कमिग बळ वाढवणारी आहे. तसेच आता खऱ्या अर्थाने भरकटलेली तरुणाई योग्य ठिकाणी आली असल्याची भावना अनिलदादा जगताप यांनी प्रवेश सोहळ्या दरम्यान व्यक्त केली. याप्रवेश सोहळ्या प्रसंगी अनिलदादा जगताप यांचे कार्यकर्ते, समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जगातली पहिली ‘विश्वसुंदरी’ काळाच्या**

कॅलिफोर्निया येथील घरी होत्या. त्यांच्या कुटुंबाने सांगितलं की, किकी हॅकन्सन यांना ४ नोव्हेंबरच्या रात्री झोपेत असतानाच देवाज्ञा झाली. त्यांच्या मृत्यूची घोषणा इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन करण्यात आली आहे.किकी हॅकन्सन ( ऋ्ळीीीं चळीी थीश्रव ) यांनी १९५१ मध्ये झालेल्या मिस वर्ल्ड या स्पर्धेत भाग घेतला आणि ही स्पर्धा त्या जिंकल्या. किकी हॅकन्सन यांनी जिंकलेल्या मिस वर्ल्ड या किताबामुळे या पुरस्काराची परंपरा जगात सुरु झाली. मिस वर्ल्ड हे या इन्स्टाग्राम अकाऊंटच्या पोस्टवरुन किकी हॅकन्सन यांना आदरांजली वाहण्यात आली आहे. आम्ही सगळे किकी हॅकन्सन यांच्या दुःखात सहभागी आहोत. आमचं प्रेम, सद्भावना हे कायमच किकी हॅकन्सन यांच्या कुटुंबासह असेल अशी पोस्ट या पेजवरुन करण्यात आली आहे. किकी हॅकन्सन यांनी मिस वर्ल्ड हा किताब जिंकण्याआधी मिस स्वीडन हा किताबही जिंकला होताकिकी हॅकन्सन ( ऋ्ळीीीं चळीी थीश्रव ) यांचा मुलगा ख्रिस अँडरसन यांनी म्हटलं आहे माझी आई आज जगात नाही, ती खूप दयाळू, प्रेमळ आणि एखाद्या मैत्रिणीप्रमाणे होती. तिची विनोदबुद्धी खूप चांगली होती तसंच ती अत्यंत मोठ्या मनाची होती. तिने जे संस्कार आमच्यावर केले आहेत त्यामुळे आम्हाला कायमच तिची आठवण येत राहिल.मिस वर्ल्ड स्पर्धेच्या अध्यक्षा जुलिया मॉर्ले म्हणाल्या, किकी हॅकन्सन ( ऋ्ळीीीं चळीी थीश्रव ) यांनी मिस वर्ल्ड हा किताब जिंकून इतिहास रचला. पहिल्या विश्वसुंदरी म्हणून त्या कायमच स्मरणात राहतील. आम्ही त्यांना विसरणं शक्य नाही. टाइम्स ऑफ इंडियाने हे वृत्त दिलं आहे. १९५१ मध्ये, पहिली मिस वर्ल्ड स्पर्धा एरिक मॉर्ले यांनी आयोजित केली होती. स्वीडनमधील विजेत्या किकी हॅकन्सन यांना बिकिनीमध्ये मुकुट घालण्यात आला होता. १९५१ मध्ये पहिल्या ‘मिस वर्ल्ड’ सौंदर्य स्पर्धेतील स्पर्धकांनी ‘बिकिनी’ परिधान केली होती. त्याचीही चर्चा त्या काळात झाली होती.

**योगी सरकारला सर्वोच्च न्यायालयाने**

सरकारवर बेकायदेशीरपणे निवासी घरे पाडल्याबद्दल ताशेरे ओढले आहेत. २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयात रस्ता रुंदीकरण प्रकल्पासाठी घरे पाडण्याशी संबंधित प्रकरणाची याचिका दाखल करण्यात आली होती. हे प्रकरण महाराजगंज जिल्ह्यातील आहे. मनोज टिब्रेवाल आकाश यांच्यावतीने ही याचिका दाखल करण्यात आली होती. महाराजगंज जिल्ह्यातील त्यांचं घर २०१९ मध्ये पाडण्यात आलं होतं, असं याचिकेत म्हटलं आहे. तसेच हे घर पाडण्याच्या आधी आपल्याला कोणत्याही प्रकारची नोटीस देण्यात आली नव्हती.या संपूर्ण प्रकरणावर आज सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने उत्तर प्रदेश सरकारवर ताशेरे ओढले. यावेळी न्यायालयाने म्हटलं की, उत्तर प्रदेश सरकारची ही कारवाई कायदा आणि सुव्यवस्थेचं उल्लंघन करणारी आहे. पण तुम्ही लोकांची घरं कशी पाडू शकता? तसेच तुम्ही या कारवाईबाबत कोणतीही सूचना का दिली नाही? लोकांच्या घरात घुसून ही कारवाई करण्यात आली. घरावर बुलडोझर कारवाई हा अधर्म आहे, अशी टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली. यासंदर्भातील वृत्त इंडियन एक्स्प्रेसने दिलं आहे.दरम्यान, राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाच्या नावाखाली आणि कोणतीही प्रक्रिया पूर्ण न करता घर अतिक्रमण म्हणून पाडण्यात आल्याचं याचिकाकर्त्याने म्हटलं. त्यानंतर न्यायालयाने यापुढे रस्ता रुंदीकरणाच्या संदर्भात योग्य ती कायदेशीर प्रक्रिया केल्यानंतर करण्यात यावी, असंही न्यायालयाने स्पष्ट केलं आहे. तसेच तुम्ही लोकांची घरे अशी कशी पाडू शकता? हा अधर्म असून या प्रकरणात नुकसान भरपाई देण्यासह उत्तर प्रदेशच्या मुख्य सचिवांना या प्रकरणात जबाबदार अधिकारी आणि कंत्राटदारांची चौकशी करण्यास आणि त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

**माझा राजकीय अस्त करण्याची**

आहेत. याच सभेत बोलताना त्यांनी लोकसभेच्या निवडणुकीत पंकजा मुंडे यांचाही गेम केला. आता माझा गेम करायची ही व्युहरचना कशासाठी असं म्हटलं आहे.याबरोबरच धनंजय मुंडे यांनी सभेत बोलताना विरोधकांवर जोरदार निशाणा साधला. तसेच मला कधी कधी तर हे देखील कळत नाही की, माझ्या सारखा व्यक्ती छोट्या घरात जन्माला आला मग तरीही माझी एवढी भीती का वाटत असेल? तुम्हाला भीती वाटत नाही ना? मग बाहेरच्यांना का भीती वाटते?, असं यावेळी धनंजय मुंडे यांनी म्हटलं. मात्र, त्यांच्या या विधानाचा रोख नेमकं कुणाकडे होता? याबाबत आता तर्कवितर्क लावले जात आहेत.

**सर्वोच्च न्यायालयाकडून अजित**

पत्रकात असेल. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या तोंडी निर्देशाला उत्तर देताना अजित पवार यांच्या वतीने ज्येष्ठ वकील बलबीर सिंग यांनी हे आश्वासन दिले.

**शरद पवारांनी दाखल केली होती याचिका :** आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला घड्याळ चिन्हाचा वापर करण्यापासून रोखण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने दाखल केलेल्या अर्जावर न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती दीपंकर दत्ता आणि उज्वल भुयान यांच्या खंडपीठासमोर सुनावणी सुरू झाली. या अर्जाद्वारे शरद पवार यांनी अजित पवार यांना विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी नवीन चिन्हासाठी अर्ज करण्याचे निर्देश देण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाकडे केली.

**३६ तासांच्या आत सूचना प्रकाशित करा :** आजच्या सुनावणीत ज्येष्ठ वकील बलबीर सिंग यांनी दावा केला की, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) ‘घड्याळ’ चिन्ह वापरण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने घातलेल्या सर्व अटींचे पालन करत आहे. नवीन हमीपत्र प्रकाशित करण्यासाठी वृत्तपत्रांशी संपर्क साधला आहे. यावर न्यायालयाने म्हटलं की, तुम्ही वृत्तपत्रांमध्ये डिस्क्लेमर प्रकाशित करण्यासाठी वेळ का घेत आहात? आम्ही तुम्हाला दिवस देत नाही आहोत, आम्ही विचारत आहोत की तुम्ही हे किती तासांत करू शकता? असा सवाल न्यायमूर्ती कांत यांनी केला. सिंग म्हणाले की, दोन-तीन दिवसांत ते करता येईल. त्यावर न्यायमूर्ती कांत सिंग म्हणाले, २४ तासांच्या आत, किंवा जास्तीत जास्त ३६ तासांत तुम्ही वृत्तपत्रांमध्ये अस्वीकरण प्रकाशित करा.

## पान सहा वरून

**निसर्ग संपत्तीचा ऱ्हास**

आग्रह धरण्याची गरज आहे.डोंगररांगांचे असेच लंचके तोडत- कापत गेले तर भविष्यात पुढील पिढीला इथे डोंगर होता असे शपथ घेऊन किंवा फोटो दाखवून स्पष्ट करावे लागेल.**बाला घाट** : पाश्चिम-मध्य महाराष्ट्रात वायव्य-आग्रेय दिशेने पसरलेली डोंगररांग. सह्याद्रीचाच एक फाटा असलेली ही रांग, अहमदनगर जिल्ह्यातील हरिश्चंद्रगड डोंगररांगेपासून सुरू होते. बालाघाट डोंगररांगेचे प्रमुख तीन फाटे आहेत.पहिली रांग बीड जिल्ह्यातून पुढे परभणी जिल्ह्याच्या दक्षिण सीमेवरून नांदेड जिल्ह्यापर्यंत जाते. या रांगेची लांबी सु. ३२० किमी., रुंदी ५ ते ९ किमी. व सस.पासून उंची सु. ६०० ते ७५० मी. आहे. पश्चिमेकडील भाग सर्वांत जास्त उंचीचा (चिंचोलीजवळ ८८९ मी.) असून पूर्वेकडे क्रमाक्रमाने उंची कमी होत जाते.याच रांगेचा दुसरा फाटा आष्टी तालुक्यापासून (बीड जिल्हा) आग्रेयीस उस्मानाबाद जिल्ह्यातून पुढे कर्नाटक राज्यातील गुलबर्गा जिल्ह्यापर्यंत जातो. तिसरा फाटा परभणी जिल्ह्याच्या दक्षिण भागात सुरू होऊन आग्रेयीस आंध्र प्रदेशातील निझामाबाद जिल्ह्याच्या सरहद्दीपाशी संपतो. यांतील पहिल्या दोन डोंगररांगांदरम्यानचा पठारी भाग ‘बालाघाट पठार’ या स्थानिक नावाने ओळखला जातो.ही डोंगररांग म्हणजे दख्खनच्या पठारावरील लाव्हापासून बनलेले व बेसाल्ट खडकांचे ठळक भूविशेष असलेली आहे.हरिश्चंद्र डोंगर -बालाघाट डोंगर रांगा सह्याद्री पर्वतातील कळसुबाई पासून ही डोंगररांग सुरू होऊन पूर्वेकडे (आग्नेय) उस्मानाबाद- लातूर जिल्हा पर्यंत पसरली आहे. दुसरी बाजू अहमदनगर जिल्ह्यात या डोंगर रांगेस हरिश्चंद्रगड असे म्हणतात ाच डोंगररांगेला पुढे बीड जिल्ह्यात बालाघाट डोंगर या नावाने ओळखली जाते. या डोंगररांगेत उत्तरेकडील पूर्व वाहिनी गोदावरी व दक्षिणेकडील पूर्व वाहिनी भीमा नदी या दोन नद्यांची खोरी वेगळी केलेली आहेत या डोंगररांगेवर पुणे जिल्ह्यातील शिवनेरी किल्ला आहे.

या नद्यांच्या क्षरण कार्यामुळे या पठारी प्रदेशाची रुंदी कमी झाली आहे. बिंदुसरा, कुंडलिका, सरस्वती, वाण इ. या डोंगररांगेतून वाहणाऱ्या नद्या गोदावरी व मांजरा नद्यांच्या उपनद्या आहेत. या रांगेचा दक्षिण उतार उत्तर उतारापेक्षा मंद आहे.बालघाट डोंगररांगेमुळे बीड जिल्ह्याचे उत्तर व दक्षिण असे दोन भाग झाले आहेत. या भागात पर्जन्याचे प्रमाण कमी असल्याने बहुधा हा अवर्षणग्रस्त असतो. पूर्व भाग मात्र अत्यंत खडकाळ आहे. या प्रदेशातील लहानलहान गावे मेंढपाळांनी मळलेल्या वाटांनी जोडलेली आहेत. पुणे-नासिक राष्ट्रीय महामार्ग क्र. ५० व दौंड-मनमाड हा लोहमार्ग ही डोंगररांग पार करून जातात.

**पक्षादेश डावलणाऱ्याची**

चालू ठेवले होते. त्यांना वेळोवेळी त्याबद्दल समज व पूर्ण संधी दिली होती. मात्र त्यात सुधारणा करण्याच्या ऐवजी सय्यद याकूब यांनी पक्षा विरुध्द उघडपणे बंडाची भूमिका घेतली. पक्षाबाहेरील काही मंडळींचा सल्ला व पाठिंब्याने वैयक्तिक हितासंबंधापोटी त्यांनी हे पाऊल टाकले आहे, असे जिल्हा कमिटीचे मत आहे. शेतकरी-कष्टकरी विरोधी, धर्मांध, भ्रष्ट महायुतीचा या निवडणुकीत पराभव करून महाविकास आघाडीला विजयी करण्याचे आवाहन, माजलगाव विधानसभा मतदार संघातील सर्व जनतेला मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने जिल्हा सचिव कॉ.अजय बुरांडे, राज्य कमिटी सदस्य कॉ. पी. एस. घाडगे,कॉ. रोहिदास जाधव, माजलगाव तालुका सचिव कॉ. मुसद्दिक बाबा सर आदींनी केले आहे.

**चळवळीच्या कार्याची**

करून पक्ष संघटन वाढविण्याचे काम आगामी काळात इमाने-इतबारे पार पाडीन. असे प्रतिपादन युवा रिपाइंचे नवनिर्वाचित पाटोदा तालुका अध्यक्ष विशाल मस्के यांनी निवडी प्रसंगी केले.यावेळी राजू जोगदंड, अविनाश जावळे, महेश आठवले,अविनाश जोगदंड, प्रभाकर चांदणे, हरीश मस्के, किशोर जावळे,धम्मा पारवेकर, प्रदीप उबाळे, रामदास मस्के, अंजीर मस्के,मधुकर साळवे, राहुल वाघमारे आदी उपस्थित होते.

**वर्गमित्रांच्या आठवणींचा**

सांगणे तसेच जुन्या आठवणीवर चर्चा करत या स्नेह मेळावा सोहळ्यासाठी पाच नोव्हेंबर हा दिवस निश्चित करत कार्यक्रम संपन्न केला. यावेळी उपस्थित शाळेतील सर्व शिक्षक तसेच वर्गमित्र दत्ता काळे,लक्ष्मण राऊत,अतुल शिंदे,सिकंदर शेख,चेतन देशमुख,नारायण कदम,रामेश्वर नखाते,हनुमंत गालफाडे,संदीप नखाते,अशोक मगर,विजय गायकवाड,प्रदीप मोरे व सर्व मुली ,मुल उपस्थित होते.

**क्षीरसागरांनी ४० वर्षात**

आपल्या बीडवासियांना क्षीरसागरांच्या तावडीतून वाचवू शकता, आम्ही जीवाचं रान करू पण यंदा विजयाचा गुलाल तुमच्या कपाळी लावू आणि बीड क्षीरसागर मुक्त करण्यासाठी लढा देऊ असा ठाम निश्चय या बैठकीत सर्व जाती-धर्मातील बीड विधानसभा अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांच्या समर्थकांनी केला. याप्रसंगी मराठा संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील समर्थक, मराठा सेवक तसेच सर्व जाती-धर्मातील माणसं उपस्थित होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

## SHORT न्यूज



### अमित शाह यांची गुरुवारी कोल्हापूरात सभा

**नवी दिल्लीः** केंद्रीय गृहमंत्री आणि भाजप नेते अमित शाह यांची महाराष्ट्रातील पहिली सभा ही गुरुवारी, ७ नोव्हेंबर रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील कोल्हापूर दक्षिण मतदारसंघात होणार आहे. त्या ठिकाणी काँग्रेस नेते सतेज पाटील यांचे पुतणे ऋतुराज पाटील निवडणुकीसाठी उभे आहेत. त्याच दिवशी त्यांच्या सांगली, सातारा आणि पुण्यामध्येही सभा होणार आहेत. तर योगी आदित्यनाथ यांच्या सभेचेही वेळापत्रक समोर आले आहे.

### कॅनडात हिंदुंचे शक्तिप्रदर्शन

**नवी दिल्लीः** कॅनडाच्या ब्रॅम्प्टनमधील हिंदू सभा मंदिरावर खलिस्तानी समर्थकांनी केलेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ कॅनडातील हिंदू समुदायाने एकता रॅली काढली. ३ नोव्हेंबर रोजी झालेल्या खलिस्तानी हल्ल्यानंतर हिंदू सभा मंदिर आणि समुदायाची एकता दर्शवण्यासाठी ४ नोव्हेंबरच्या रात्री ब्रॅम्प्टन येथील हिंदू सभा मंदिराबाहेर मोठी गर्दी झाली होती.

## SOCIAL न्यूज

### श्रीमंतांच्या यादीत जेफ बोजेस हे पुन्हा दुसऱ्या स्थानावर

**वॉशिंग्टनः** जगातील श्रीमंतांच्या यादीत जेफ बोजेस हे पुन्हा दुसऱ्या स्थानावर पोहचले आहेत. गेल्या काही दिवसात ॲमेझॉनच्या शेअर्समध्ये वाढ होत असल्याने त्यांनी दूसरे स्थान पटकावले आहे. शेअर्स मध्ये वाढ झाल्यावर त्यांनी ३ बिलीअन डॉलर्सच्या किंमतीचे शेअर्स विकले आहेत. यावर्षी त्यांनी एकूण १३ बिलीयन डॉलर्सचे शेअर्स विकले आहेत. ब्लुमबर्ग बिलिनेयर्सनुसार त्यांची एकूण संपत्ती आता २२२ बिलीयन डॉलर्सवर पोहचली आहे.

### .. माझे तिकीट का कापले हे विचारले नाही


**मुंबईः** भाजप नेत्या पूनम महाजन यांनी लोकसभा निवडणुकीत भाजपने कापलेल्या तिकिटावर प्रथमच भाष्य केले आहे. लोकसभा निवडणुकीत माझे तिकीट कापण्यात आले. ते एक षडयंत्र होते. पण मी ते षडयंत्र काय होते? ते कुणी रचले होते? ते शोधण्याच्या फंद्यात पडले नाही. कारण या सर्व छोट्या गोष्टी आहेत.

## इतिहासात आज

०६ नोव्हेंबर
ठळक घटना / घडामोडी

- **१८६०:** अब्राहम लिंकन अमेरिकेचे १६ वे अध्यक्ष म्हणून निवडून आले.
- **१८८८:** महात्मा गांधींनी कायद्याच्या अभ्यासासाठी लंडन येथे प्रवेश घेतला.
- **१९१३:** दक्षिण आफ्रिकेत भारतीय वंशाच्या खाणकामगारांच्या मोर्चाचे नेतृत्त्व केल्याबद्दल महात्मा गांधींना अटक करण्यात आली.
- **१९९६:** 'अर्जेंटिनाचे गांधी' म्हणून ओळखले जाणारे प्रा. अडोल्फो डी. ओबिएता यांना पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांच्या हस्ते 'जमनालाल बजाज आंतरराष्ट्रीय पुरस्कार' प्रदान

# हॅरिस की ट्रम्प? राष्ट्राध्यक्षपदासाठी मतदान प्रारंभ




कोलंबियाः उत्तर कॅरोलिनामध्ये मतदान केंद्रावर लोकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

## अमेरिकेच्या ५० राज्यांमध्ये मतदान

वृत्तसंस्था

**वॉशिंग्टनः** अमेरिकेतील ४७व्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी मंगळवारी भारतीय वेळेनुसार दुपारी ४ वाजता मतदानाला सुरुवात झाली. बुधवार, ६ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजेपर्यंत जवळपास सर्व ५० राज्यांमध्ये मतदान पूर्ण होईल. राज्यांमध्ये मतदान संपताच मतमोजणी सुरू होईल.

रिपब्लिकन पक्षाकडून डोनाल्ड ट्रम्प आणि डेमोक्रॅटिक पक्षाकडून भारतीय वंशाच्या कमला हॅरिस अध्यक्षपदासाठी



रिंगणात आहेत. कमला हॅरिस या सध्या अमेरिकेच्या उपराष्ट्रपती आहेत, तर ट्रम्प हे २०१७ ते २०२१ पर्यंत राष्ट्राध्यक्ष होते.

अमेरिकेच्या ५० राज्यांमध्ये आणि राजधानी वॉशिंग्टन डीसीमध्ये एकूण ५३८ इलेक्टोरल मते आहेत. निवडणूक जिंकण्यासाठी ट्रम्प किंवा कमला यांना २७० जागा जिंकणे आवश्यक आहे.

**१२ मिनिटांत पहिला निकालः** डिक्सविले नॉच, न्यू हॅम्पशायर येथे मतदान सुरू झाल्यानंतर केवळ १२ मिनिटांत निकाल आले. येथे केवळ ६ मते पडली. यापैकी ४ रिपब्लिकन पक्षाचे नोंदणीकृत मतदार आहेत. असे असतानाही रिपब्लिकन पक्षाला ३५ तर डेमोक्रॅटिक पक्षाला ३ मते मिळाली.

# प्रचारतोफा धडाडण्यास सुरुवात

## महायुतीच्या प्रचाराचा कोल्हापुरातून नारळ फुटला

वृत्तसंस्था

**कोल्हापूरः** विधानसभेसाठी राज्यातील लढतींचे चित्र स्पष्ट झाले असून महायुती व महाविकास आघाडीच्या प्रचारसभा सुरू झाल्या आहेत. आपणच सक्षम नेतृत्व देऊ शकतो, असा विश्वास राज्यातील मतदारांना देण्याचा प्रयत्न दोन्ही गटातील उमेदवार देण्याचा प्रचारसभांमधून देण्याचा प्रयत्न करीत आहेत. कोल्हापुरातून आज महायुतीचा प्रचार सुरु झाला. यावेळची निवडणूक ही दोन्ही गटांतील सर्व सहा पक्षांसाठी अटीतटीची व अत्यंत महत्वाची असल्याने प्रचारदेखील तेवढाच प्रभावी व आक्रमक होताना दिसणार आहे. एकंदरीत प्रचारात मुद्दे व टीकेची आतषबाजी बघायला मिळणार आहे. यावेळची निवडणूक ही नेहमीपेक्षा खास असल्याची जाणीव प्रत्येक पक्षाला आहे.

### लाडक्या बहिणींना 2100 रुपये, तर पीएम किसानचे 15 हजार करणार : मुख्यमंत्री शिंदे

**कोल्हापूरः** लाडक्या बहिणींच्या अशिर्वादामुळे ही योजना सुपरहिट झाली. त्यामुळे विरोधकांच्या पोटात पोटशुळ उठले आहे, काही



सावत्र भाऊ ही योजना बंद पडावी म्हणून कोर्टात गेले आहेत. पण हा एकनाथ शिंदे जेलमध्ये जाईल पण ही योजना कधीही बंद पडू देणार नाही, असा निर्धारही मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला.

**मुख्यमंत्र्यांची दहा आश्वासने**

- लाडक्या बहिणींना १५०० वरून २१०० रुपये, २५ हजार महिलांना पोलीस दलात समावेश.
- शेतकऱ्यांना कर्ज माफी आणि शेतकरी सन्मान योजनेतून वर्षाला १५००० रुपये, MSP वर २० टक्के अनुदान.
- प्रत्येकास अन्न आणि निवारा.
- वृद्ध पेंशन धारकांना २१०० रुपये.
- जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर ठेवणार.
- २५ लाख रोजगार निर्मिती तसेच १० लाख विद्यार्थ्यांना १०००० रुपये
- ४५००० गावांत पाणंद रस्ते बांधणार.
- अंगणवाडी आणि आशा सेविकांना १५,००० आणि सुरक्षा कवच.
- वीज बिल ३० टक्के कपात करून सौर आणि अक्षय ऊर्जेवर भर देणार.
- सरकार स्थापनेनंतर व्हिजन महाराष्ट्र @2029 शंभर दिवसांच्या आत सादर करणार.

### 'जनतेची साथ हवी'- उपमुख्यमंत्री फडणवीस

प्रत्येकच्या जीवनात परिवर्तन घडवण्याचे काम करायचे आहे, तुमची



साथ हवी. आमची एकही योजना बंद होणार नाही. महाआघाडीचे नेते लाडकी योजनेच्या विरोधात कोर्टात गेले आहेत, ते सगळ्या योजना बंद करतील. भाजपच्या राज्यातील सर्व योजना सुरू आहेत. तुम्ही आशीर्वाद द्या, तुमच्या मनातील महाराष्ट्र घडवून दाखवतो, असा निर्धार उपमुख्यमंत्री फडणवीसांनी व्यक्त केला.

# शिवसेना पक्ष व धनुष्यबाणावर 10 नोव्हेंबरला सुनावणी

वृत्तसंस्था

**नवी दिल्लीः** शिवसेना पक्ष (Shivsena Party) आणि धनुष्यबाण चिन्ह प्रकरणावर येत्या १० नोव्हेंबरला सुनावणी होणार आहे. निवडणूक आयोगाने दिलेल्या निकालाविरोधात उद्धव ठाकरे यांनी याचिका दाखल केली होती. आता यावर मुख्य न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या निवृत्तीच्या शेवटच्या दिवशी सुनावणी होणार आहे. कामाच्या शेवटच्या दिवशी तरी CJI काही महत्त्वाचे निर्देश देणार का? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे. देशाचे मुख्य न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड हे येत्या १० नोव्हेंबर रोजी निवृत्त होणार आहेत. त्यादिवशी ते काही महत्वाचे निर्णय घेणार आहेत. यातीलच एक अत्यंत महत्वाचा निर्णय म्हणजे शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हावर असलेली सुनावणी. या निर्णयाकडं संपूर्ण देसाचं लक्ष लागलं आहे. त्याचबरोबर अलीगट मुस्लिम विद्यापीठाला अल्पसंख्याक दर्जा, मदरसा कायद्याची वैधता, सरकारी संपत्तीचे पुनर्वितरण, वाहन परवाना कायदा तसेच सरकारी नियुक्ती प्रक्रियेतील नियमांबद्दलच्या विषयांवर निर्णय देणार आहेत.

# प्रत्येकच खासगी मालमत्ता सामुदायिक मालमत्ता नाही!

## खासगी मालमत्ता अधिग्रहणाबाबत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्लीः** सरकार सार्वजनिक हितासाठी खासगी मालमत्ता घेऊ शकते का? या प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयाच्या ९ न्यायाधीशांच्या खंडपीठाने मंगळवारी बहुमताने निकाल दिला. प्रत्येक खासगी मालमत्तेला सामुदायिक मालमत्ता म्हणता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने



म्हटले आहे. सरकार केवळ काही संसाधनांना सामुदायिक संसाधने मानू शकते आणि त्यांचा सार्वजनिक हितासाठी वापर करू शकते, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

CJI चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील ९ न्यायाधीशांच्या घटनापीठापैकी ७ न्यायाधीशांनी या निर्णयाला पाठिंबा दिला. जुना निर्णय विशेष आर्थिक, समाजवादी विचारसरणीने प्रेरित असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे.

**१६ याचिकांवर सुनावणी**

१९९२ मध्ये मुंबईस्थित प्रॉपर्टी ओनर्स असोसिएशनने (POA) दाखल केलेल्या मुख्य याचिकेसह १६ याचिकांवर खंडपीठ सुनावणी करत होता. पीओएने महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास कायदा (म्हाडा) कायद्याच्या धडा VIII-De ला विरोध केला आहे.

# आणखी किती निवडणुका लढवायच्या? कुठेतरी थांबले पाहिजे



## शरद पवार यांचे संसदीय राजकारणातून निवृत्तीचे संकेत

**नवी पिढी तयार करण्याची गरज!**

दरवेळी तुम्ही मला निवडून दिले. पण आता कुठेतरी थांबले पाहिजे. नवी पिढी समोर यावी हे सूत्र हाती घेऊन आता मी कामाला लागलो आहे. पण याचा अर्थ मी समाजकारण सोडले असा नाही. सत्ता नको, पण लोकांची सेवा, लोकांचे काम करतच राहायचे. ज्या भागात दलित, भटके विमुक्त, उपेक्षित या वर्गासाठी काही करता येईल ते करायचे, असेही पवार म्हणाले.

वृत्तसंस्था

**पुणेः** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी संसदीय राजकारणातून संन्यास घेण्याचे संकेत दिलेत. आतापर्यंत मी १४ निवडणुका लढल्या. आणखी किती लढवायच्या? कुठेतरी थांबले पाहिजे. नवी पिढी समोर यावी हे सूत्र हाती घेऊन मी आता कामाला लागलो आहे, असे ते बारामती येथे आयोजित एका प्रचारसभेत बोलताना म्हणालेत. त्यांच्या या विधानामुळे ते सक्रिय राजकारणातून संन्यास घेणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.


शरद पवार सध्या आपले नातू तथा बारामती विधानसभा मतदारसंघातील उमेदवार युगेंद्र पवार यांच्यासाठी प्रचारसभा घेत आहेत. त्यांनी मंगळवारी एका प्रचारसभेला संबोधित करताना संसदीय राजकारणातून संन्यास घेण्याचे संकेत दिले. ते म्हणाले, मी सध्या सरकारमध्ये नाही. माझ्या राज्यसभेचे अजून दीड वर्षे शिल्लक आहेत. त्यानंतर पुन्हा राज्यसभेवर जायचे की नाही याचा मला विचार करावा लागेल. मी आता लोकसभाच नाही तर कोणतीही निवडणूक लढवणार नाही. किती निवडणुका लढवायच्या. आतापर्यंत १४ निवडणुका लढल्या. तुम्ही एकदाही घरी पाठवले नाही.

# गुजरातमध्ये बुलेट ट्रेनचा ट्रॅक पूल कोसळला

वृत्तसंस्था

**आणंदः** गुजरातमधील आणंदमध्ये बुलेट ट्रेनसाठी बांधण्यात येत असलेल्या ट्रॅकचा बांधकामाधीन पूल कोसळला आहे. या अपघातात २ मजूर ठार तर एक गंभीर जखमी झाला आहे. पुलाच्या ढिगाऱ्याखाली अनेक जण दबल्याची माहिती आहे.

आणंद जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक जी. जी. जसानी यांनी सांगितले की, वसदजवळ बुलेट ट्रेनचा प्रकल्प सुरू होता, त्यामध्ये लोखंडी जाळी पडल्याने तीन ते चार मजूर गाडले गेल्याची माहिती मिळाली. दोन मजुरांचा मृत्यू झाला, तर एक मजूर बचावला आहे. अजूनही एक मजूर



अडकल्याची शक्यता असून बचावकार्य सुरू आहे.

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन कॉरिडॉरसाठी गुजरातमधील एकूण २० नदीवरील पुलांपैकी १२ पुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. ही माहिती देताना, नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड ने म्हटले आहे की, गुजरातमधील नवसारी जिल्ह्यातील खरेरा नदीवरील १२० मीटर लांबीचा पूल नुकताच पूर्ण झाला आहे.

### २ मजूर ठार, एक गंभीर जखमी

- मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन कॉरिडॉरसाठी गुजरातमधील एकूण २० नदीवरील पुलांपैकी १२ पुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. ही माहिती देताना, नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड ने म्हटले आहे की, गुजरातमधील नवसारी जिल्ह्यातील खरेरा नदीवरील १२० मीटर लांबीचा पूल नुकताच पूर्ण झाला आहे. यासह १२ पुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

# संजय वर्मा राज्याचे नवे पोलिस महासंचालक

वृत्तसंस्था

**मुंबईः** निवडणूक आयोगाने आज (दि.५) महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालकपदी संजय कुमार वर्मा यांची नियुक्ती केली. संजय कुमार वर्मा हे १९९०च्या आयपीएस बॅचचे अधिकारी आहेत.

केंद्रीय निवडणूक आयोगाने पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांना पदावरून हटवल्यानंतर आहे.



## रश्मी शुक्ला यांना केंद्रीय निवडणूक आयोगाने हटविले

राज्यातील विधानसभा निवडणूकांसाठी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र दौरा केला होता. यावेळी आढावा बैठका घेण्यात आल्या. दरम्यान काँग्रेसह अनेक विरोधी पक्षांनी पोलीस महासंचालकांना हटवण्याची मागणी केली होती. राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या घोषणेच्यावेळी अधिकाऱ्यांना केवळ निष्पक्षपणे त्यांचे कर्तव्य पार पाडताना पक्षपातीपणा करू नये अशा इशारा देखील आयुक्तांनी दिला होता.

मुंबईचे पोलिस आयुक्त विवेक फणसाळकर यांच्याकडे राज्याच्या पोलीस महासंचालक पदाचा कार्यभार सोपवण्यात आला होता. राज्यातील विधानसभा निवडणूकांसाठी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र दौरा केला होता. यावेळी आढावा बैठका घेण्यात आल्या.

# केंद्र सरकारची विकीपिडियाला नोटीस

## साइटवरील पक्षपाती भूमिका आणि अनेक चुका

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्लीः** केंद्र सरकारने मंगळवारी विकिपीडियाला नोटीस बजावली. यातून सरकारने त्यांच्या साइटवरील पक्षपाती भूमिका आणि अनेक चुका असल्याबाबतच्या तक्रारी निदर्शनास आणून दिल्या आहेत. विकिपीडियाला मध्यस्थ ऐवजी प्रकाशक म्हणून का मानले जाऊ नये, अशीही विचारणा केंद्राने केली आहे.

'एडिटर्सच्या एका छोट्या गटाचे कंटेंटवर नियंत्रण असल्याचे दिसते. ही त्याच्या तटस्थतेवर संभाव्य प्रभाव पाडणार आहे, असे केंद्र सरकारने पत्रात म्हटले आहे. दरम्यान, सरकार अथवा विकिपीडिया या दोघांनीही यावर अद्याप काही अधिकृत निवेदन जारी केलेले नाही. विकिपीडिया हा एक विनामूल्य ऑनलाइन विश्वकोश म्हणून ओळखला जातो. यावर स्वयंसेवकांना लोकांसह समस्या आणि माहितीच्या विविध क्षेत्रांसह विविध विषयांवर पृष्ठे तयार करण्याची आणि संपादित करण्याची परवानगी दिली जाते.

# राज्यात सगळीकडे मशाल धगधगलेली दिसायला हवी - उद्धव ठाकरे

वृत्तसंस्था

**रत्नागिरीः** तुमचं भविष्य तुम्हाला शिवशाही मानणाऱ्या



कार्यकर्त्यांच्या हातात द्यायचं आहे की, गुंडांच्या ताब्यात द्यायचं, ते तुम्ही ठरवायचं आहे. कोल्हापुरातील राधानगरीत माझ्या सभेला प्रचंड गर्दी दिसून आली. लोक स्टेजला खेटून लोक बसले होते. सगळीकडे मशाल पेटताना दिसत आहे. मुंबईपासून संपूर्ण किनारपट्टीपर्यंतच नाही, तर मला राज्यात सगळीकडे मशाल धगधगलेली दिसायला पाहिजे, असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी ठाकरे सेनेच्या कार्यकर्त्यांना केले.

तसेच खोकेबाजीचं राजकारण आपल्याला आताच जाळून भस्म करायला करायला हवं, असा टोलाही शिंदेंचे नाव न घेता लगावला.

रत्नागिरीतील आज उद्धव ठाकरेंची सभा पार पडली, यावेळी ते बोलत होते.

# राज्यात ६ लाख ४१ हजार ४२५ दिव्यांग मतदार

प्रतिनिधी

**मुंबई :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी एकूण ६ लाख ४१ हजार ४२५ दिव्यांग मतदारांची नोंदणी झाली आहे. यामध्ये ३ लाख ८४ हजार ६९ पुरुष मतदार, २ लाख ५७ हजार ३१७ महिला दिव्यांग मतदार, तसेच ३९ तृतीयपंथी दिव्यांग मतदारांचा समावेश आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

पुणे जिल्ह्यात सर्वाधिक दिव्यांग मतदार आहेत. पुणे येथे ८८ हजार ९३७ दिव्यांग मतदार नोंदणीकृत आहेत. यामध्ये ४८ हजार ६२६ पुरुष, ४० हजार ३०१ महिला आणि १० तृतीयपंथी दिव्यांग मतदारांचा समावेश आहे. पुणे पाठोपाठ ठाणे जिल्ह्यात ३८ हजार १४९ दिव्यांग मतदारांची नोंदणी झाली आहे. यामध्ये २१ हजार ५७३ पुरुष मतदार, १६ हजार ५७३ महिला मतदार आणि ३ तृतीयपंथी दिव्यांग मतदार आहेत. दिव्यांग मतदारांची सर्वात कमी नोंदणी गडचिरोली जिल्ह्यात आहे. येथे ६ हजार ४३ दिव्यांग मतदारांची नोंद आहे. यामध्ये ३ हजार ७१० पुरुष आणि २ हजार ३३३ महिला दिव्यांग मतदारांचा समावेश आहे.

राज्यात तृतीयपंथी दिव्यांग

- राज्यात तृतीयपंथी दिव्यांग मतदारांची एकूण संख्या ३९ आहे. सर्वाधिक तृतीयपंथी दिव्यांग मतदार औरंगाबाद जिल्ह्यात आहेत. एकूण १२ तृतीयपंथी दिव्यांग मतदार आहेत. पुणे जिल्ह्यात १०, नांदेड जिल्ह्यात ६, ठाणे जिल्ह्यात ३, आणि पालघर व जळगाव जिल्ह्यात प्रत्येकी २ तृतीयपंथी दिव्यांग मतदारांची नोंदणी झाली आहे. याशिवाय मुंबई उपनगर, लातूर, सोलापूर आणि सांगली या जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी १ तृतीयपंथी दिव्यांग मतदार नोंदणीकृत आहेत.

### सर्वाधिक दिव्यांग मतदार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात



पुणे जिल्ह्यात १०, नांदेड जिल्ह्यात ६, ठाणे जिल्ह्यात ३, आणि पालघर व जळगाव जिल्ह्यात प्रत्येकी २ तृतीयपंथी दिव्यांग मतदारांची नोंदणी झाली

### विधानसभा निवडणूक

मतदारांची एकूण संख्या ३९ आहे. सर्वाधिक तृतीयपंथी दिव्यांग मतदार औरंगाबाद जिल्ह्यात आहेत. एकूण १२ तृतीयपंथी दिव्यांग मतदार आहेत. पुणे जिल्ह्यात १०, नांदेड जिल्ह्यात ६, ठाणे जिल्ह्यात ३, आणि पालघर व जळगाव जिल्ह्यात प्रत्येकी २ तृतीयपंथी दिव्यांग मतदारांची नोंदणी झाली आहे. याशिवाय मुंबई उपनगर, लातूर, सोलापूर आणि सांगली या जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी १ तृतीयपंथी दिव्यांग मतदार नोंदणीकृत आहेत.

**सुविचार** - खरी शांतता म्हणजे आनंदी जीवन.

# जागतिक निवडणूक....!

आपल्याकडे महाराष्ट्र, झारखंड या राज्यांच्या विधानसभा निवडणुकीसोबतच काही पोटनिवडणुकांची धामधूम सुरू असताना तिकडे जागतिक राजकारणाच्या दृष्टीने परिणामकारक ठरू शकेल अशा अमेरिकन राष्ट्राध्यक्ष पदाची निवडणूक होत आहे. या निवडणुकीसाठी मंगळवारी मतदान पार पडले. रशिया आणि युक्रेन दरम्यान सुरू असलेले युद्ध, मध्यपूर्वेत सुरू असलेला संघर्ष, चीन-रशिया आघाडीने जगासमोर उभे केलेले आव्हान, जागतिक अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने या सगळ्याच्या पृष्ठभूमीवर ही निवडणूक खूपच महत्त्वाची ठरू पाहत आहे. या निवडणुकीच्या प्रचारात आंतरराष्ट्रीय मुद्यांऐवजी स्थलांतरीतांचे प्रश्न, धार्मिक मुद्दे, गोरे आणि गोरेतर अशी विभागणी अशा मुद्यांची रेलचेल पाहायला मिळाली असली तरी अमेरिकेच्या अध्यक्षपदी कोण विराजमान होणार हे जगाच्या दृष्टीने खूप अधिक महत्त्वाचे आहे. डोनाल्ड ट्रम्प पुन्हा अध्यक्ष झाले तर जगाच्या दृष्टीने तो एक काळजीचा विषय असेल असे जगातील बहुतेक देशांना वाटत आहे, अमेरिकेतही त्यांच्या बाबतीत अशी भीती असणाऱ्यांचे प्रमाण खूप मोठे आहे. स्थलांतरीतांच्या मुद्यावरील त्यांची आक्रमक भूमिका, व्यापाराच्या संदर्भात अतिशय टोकाचे त्यांचे मतप्रदर्शन अनेकांना संकटाला आमंत्रण देणारे वाटत आहे. पुतीन यांच्या रशियाला मात्र ट्रम्प या निवडणुकीत जिंकावे असेच वाटत आहे. इस्त्रायलदेखील कदाचित ट्रम्प यांच्या विजयाची प्रतीक्षा करीत असावा. परंतु अमेरिकेतील अध्यक्षीय निवडणुकीची जी काही प्रक्रिया आहे ती पाहता ट्रम्प यांच्यासमोर मोठे आव्हान नक्कीच आहे. अमेरिकेच्या अध्यक्षांची निवड करण्याची प्रक्रिया गुंतागुंतीची असते. अमेरिकी अध्यक्षपदाच्या निवडणुकीत ५३८ जागांसाठी मतदान होते. अमेरिकी प्रतिनिधिगृहाच्या ४३८ जागा आणि अमेरिकी सेनेटच्या १०० जागा असे एकूण ५३८ मतदारसंघ असतात. त्यापैकी २७० जागा मिळवणारा उमेदवार विजयी ठरतो. अमेरिकन मतदार दोन प्रकारची मते देत असतो. त्यापैकी एक म्हणजे प्रत्यक्ष मत ज्याला पॉप्युलर वोट्स म्हणतात आणि दुसरे म्हणजे प्रातिनिधिक मते, ज्याला इलेक्टोरल वोट्स म्हणतात. या निवडणुकीत रिपब्लिकन आणि डेमोक्रॅट असे दोन मुख्य पक्ष लढतीत आहेत. दोन्ही पक्ष प्रत्येक राज्यात आपले प्रतिनिधी (इलेक्टर) नेमतात. मतदार अध्यक्षीय उमेदवारांना थेट मत न देता संबंधित प्रतिनिधींना देतात. प्रत्येक राज्यातून निवडल्या जाणाऱ्या प्रतिनिधींची संख्या वेगवेगळी आहे. कॅलिफोर्निया राज्यातून सर्वाधिक ५४ प्रतिनिधी निवडले जातात तर नॉर्थ डकोटा, साऊथ डकोटा सारख्या राज्यातून केवळ तीन प्रतिनिधी निवडले जातात. अमेरिकेतील ४८ राज्ये आणि डिस्ट्रिक्ट ऑफ कोलंबियामध्ये इलेक्टोरल वोट्सचा विचार होतो. पण नेब्रास्का आणि मेन ही दोन राज्ये यास अपवाद आहेत. तेथे प्रत्येक जिल्ह्यातून प्रत्यक्ष मते अधिक मिळवणाऱ्या उमेदवारास त्या जिल्ह्याचे प्रातिनिधिक मत मिळते. अमेरिकेत मतदानाची सुरूवात खूप आधीपासून होते. मंगळवारी जे झाले ते अंतिम मतदान होते, परंतु त्या आधीच अनेक राज्यांमध्ये टपालाद्वारे मतदानाची प्रक्रिया सुरू झालेली होती. अमेरिकेचे जगभरात वास्तव्यास असलेले मुत्सद्दी, राजनैतिक कर्मचारी, सैनिक आणि सामान्य नागरिक टपालाद्वारे मतदान करतात. अंतिम मतदान पार पडल्यानंतर साधारण डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात विजयी पक्षाचे प्रतिनिधी अध्यक्षपदाचा उमेदवार निवडतात, ज्याला सर्वाधिक मते मिळतात तो उमेदवार अध्यक्ष म्हणून घोषित केला जातो. अमेरिकेमध्ये डेमोक्रॅटिक आणि रिपब्लिकन पक्षाची पारंपरिक समर्थक राज्ये आहेत. या समर्थक राज्यांच्या प्रतिनिधींची संख्या विचारात घेतली तर सध्या डेमोक्रॅटिक उमेदवार कमला हॅरिस यांना २२६ इलोक्टोरल आणि ट्रम्प यांना २१९ इलेक्टोरल मते मिळतील हे जवळपास निश्चित आहे. याचा अर्थ निर्णायक बहुमत मिळविण्यासाठी हॅरिस यांना ४४ आणि ट्रम्प यांना ५१ मतांची गरज भासेल. त्यासाठी या दोन्ही उमेदवारांना पेनसिल्वेनिया, व्हिस्कॉन्सिन, मिशिगन, जॉर्जिया, नॉर्थ कॅरोलिना, ॲरिझोना आणि नेवाडा या राज्यांवर अवलंबून राहावे लागणार आहे. या राज्यांमधून एकूण ९३ प्रतिनिधी निवडले जाणार आहेत. अमेरिकेत या राज्यांना ठस्विंग स्टेट' संबोधले जाते. २०१६च्या निवडणुकीत हिलरी क्लिंटन यांना ट्रम्प यांच्या तुलनेत अधिक पॉप्युलर मते मिळाली होती, परंतु प्रतिनिधी मतांमध्ये ट्रम्प वरचढ ठरल्याने हिलरी क्लिंटन यांना पराभव स्वीकारावा लागला होता. या पृष्ठभूमीवर हे 'स्विंग स्टेटस्' यावेळी कोणती करामत दाखवितात यावर या निवडणुकीचे भवितव्य अवलंबून असेल.

# अंतर्गत खदखद.....!

विधानसभा निवडणुकीत महायुती म्हणून तीन तर महाआघाडी म्हणून तीन पक्ष एकमेकांना सामोरी जात असली तरी निवडणुकीनंतर महायुती किंवा महाआघाडीचे स्वरूप सध्या आहे तसेच कायम असेल की नाही याबद्दल आतापासूनच शंका व्यक्त केली जात आहे. अजित पवार गटाचे दिग्गज नेते नबाब मलिक यांनी निवडणुकीनंतर राजकारणाचे चित्र बरेच बदललेले असेल, कोण कुणासोबत असेल हे सांगता येत नाही, मात्र अजित पवार 'किंग मेकर'च्या भूमिकेत असतील असे विधान केले. सध्या जरी त्यांचे हे वक्तव्य कुणी गांभीर्याने घेतले नसले तरी आघाडी आणि युतीतील अंतर्गत धुसफूस पाहता निवडणुकीनंतर राज्याचे राजकारण पुन्हा एक नवे वळण घेऊ शकते, असे चित्र समोर येत आहे. माहिम मतदारसंघातून शिंदेंनी आपला उमेदवार मागे घ्यावा म्हणून भाजपने बराच जोर लावला, परंतु शिंदेंनी त्यांना दाद दिली नाही. त्यामुळे मुंबईतील ज्या मतदारसंघात शिंदे सेनेच्या उमेदवारासमोर मनसेचा उमेदवार असेल तिथे कदाचित भाजप कार्यकर्ते मनसेला झुकते माप देण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचा परिणाम म्हणून भाजपचे उमेदवार असलेल्या मतदारसंघात शिंदेंचे शिवसैनिक वेगळी भूमिका घेऊ शकतात. त्यातच राज ठाकरेंनी निवडणुकीनंतर मनसेच्या पाठिंब्यावर भाजपचा मुख्यमंत्री बनेल, असे विधान करून शिंदे सेनेला अधिकच डिवचले आहे. त्याचवेळी तिकडे एकनाथ शिंदे आणि शरद पवार यांच्यादरम्यान काही तरी शिजत असल्याची बातमी समोर आली आहे. कदाचित शिंदे सेना आणि अजित पवार गटाला हाताशी धरून काही नवी समीकरणे शरद पवार मांडत असावेत. भाजपला एकटे पाडण्यासाठी सगळ्यांना एकत्र करण्याची हातोटी केवळ त्यांच्याकडेच आहे. कदाचित तसे काही शिजत नसले तरी दोन्ही आघाड्यांमध्ये अंतर्गत खदखद आहे यात शंका नाही. त्यातून पाडापाडीचे राजकारण देखील केले जाऊ शकते. शेवटी संख्याबळाचे गणित पाहून पुढच्या राजकीय खेळी होतील आणि त्यात कुणीही कुणाही सोबत जाऊ शकतो. फक्त भाजप आणि कॉंग्रेस एकत्र येणार नाही, ही एकच बाब निश्चित आहे, बाकी काहीही होऊ शकते.

## कटाक्ष

# महाआघाडी x महायुती !




जयंत माईणकर
9821917163


मनोज जरांगे पाटील यांनी आपण महाराष्ट्र विधानसभेत आपले उमेदवार नसतील हे घोषित करून मविआच्या नेत्यांना एक दिलासा दिला आहे. तर त्याचबरोबर ज्या मत विभाजनाच्या भरवशावर भाजप हरियाणा जिंकू शकला ते मतविभाजन महाराष्ट्रात होऊ शकत नाही आणि त्यामुळेच की काय भाजपच्या नेत्यांना महाराष्ट्र आपल्या हातात येणार नाही, याची खात्री पटल्यामुळे आता त्यांचा रोख झारखंड तरी आपल्याकडे राहावा यासाठी प्रयत्न करण्याकडे आहे. अर्थात तिथेही त्यांना अनुकूल वातावरण नाही.

मतविभाजन करणारे पक्ष म्हणजे वंचित बहुजन आघाडी आणि एम आय एम! मात्र हे दोन्ही पक्ष केवळ भाजपलाच मदत करतात हे त्या पक्षाच्या मतदारांना कळून चुकलं आणि म्हणून मतदारांनी या दोन पक्षांना लोकसभा निवडणुकीत त्यांची जागा दाखवून देत आघाडीला कौल दिला. विधानसभेतही तीच परंपरा कायम राहील असं वाटतं.

बंडखोरी सर्वच पक्षात असली तरीही महायुतीत आणि त्यातही भाजपमध्ये जास्त आहे. माजी खासदार गोपाळ शेट्टी यांच्यासारख्याची बंडखोरी रोखण्यात भाजपला यश मिळाले. मात्र शिंदे गटाने माहीममध्ये आणि अजित पवार गटाने मानखुर्द शिवाजी नगर मतदारसंघात भाजपच्या विनंतीला/विरोधाला धूप न घालता आपला उमेदवार उभा केला आहे.

माहीममध्ये 'राज'पुत्र अमित ठाकरे मनसेकडून निवडणूक लढवत आहेत. तर बाजूच्या वरळी मतदारसंघातून 'उद्धव'पुत्र आदित्य ठाकरे! दोन चुलत भाऊ लागून असलेल्या मतदारसंघात वेगवेगळ्या पक्षाकडून आपलं भविष्य आजमावत आहेत.

माहिमचे शिंदे सेनेचे आमदार सदा सरवणकर यांनी भाजपच्या विनंतीला धूप न घालता शिंदेंच्या आशीर्वादाने आपली उमेदवारी कायम ठेवली. त्यामुळे चिडलेल्या राज ठाकरेंनी ठाण्याच्या सभेत शिंदेंना चाळीस आमदार पळवून नेल्याबद्दला टार्गेट केलं. माहिममध्ये त्रिकोणी लढत होत आहे आणि तिघेही उमेदवार शिवसेनेशी संबंधित आहेत. उद्धव ठाकरेंनी तिथे महेश सावंत यांना उमेदवारी दिली आहे. तिकडे वरळीमध्ये शिंदे सेनेकडून राज्यसभा सदस्य मिलिंद देवरा यांना उमेदवारी दिली आहे. मिलिंद देवरा यांचे वडील मुरली देवरा एकेकाळी शिवसेनेच्या पाठिंब्यावर मुंबईचे महापौर बनले होते. ती घटना होती १९७५ ची! त्या पाठिंब्याच्या बदल्यात सेनेचे तीन आमदार विधान परिषदेवर गेले होते. त्यापैकी एक होते मनोहर जोशी! पण आज त्यांच्या परिवाराची दुसरी आणि तिसरी पिढी एकमेकांच्या विरुद्ध उभी ठाकली आहे.

बारामती हा एक असाच मतदारसंघ! जिथे पवार x पवार ही लढत लोकसभेत झाली होती. या लढतीचा पहिला राऊंड शरद पवारांनी जिंकला होता. नणंद भावजय यांच्या लढतीत नणंद सुप्रिया पवार सुळे श्रेष्ठ ठरल्या.

आता बारामतीत अजित पवारांच्या विरुद्ध त्यांचे सख्खे बंधू श्रीनिवास पवार यांचे चिरंजिव योगेंद्र उभे आहेत. अजित पवार गेली ३५ वर्षे बारामती मतदारसंघाच प्रतिनिधीत्व करत आहेत तर शरद पवार गेली पाच दशके! काका - पुतण्या या लढतीचा दुसरा राऊंड कोण जिंकेल यावर अजित पवार यांचं राजकीय भवितव्य अवलंबून असेल. जर त्यांचा पराभव झाला तर ती त्यांच्या राजकीय कारकिर्दीची अखेर असू शकते.

ठाकरे, पवार यांच्याव्यतिरिक्त अर्थात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा कोपरी पाचपाखाडी मतदारसंघ आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा दक्षिण पश्चिम नागपूर मतदारसंघ.

शिंदेंच्या विरोधात उद्धव ठाकरेंनी आनंद दिघे यांचे पुतणे केदार दिघे यांना उमेदवारी दिली आहे तर फडणवीसांच्या विरूध्द कॉंग्रेसने माजी मंत्री विनोद गुडधे पाटील यांचे चिरंजीव प्रफुल यांना उमेदवारी दिली आहे. नितीन गडकरीना तिसऱ्यांदा निवडून येण्यासाठी नागपुरातील गल्ल्या पिंजून काढाव्या लागल्या. काहीशी तीच अवस्था फडणवीसांची आहे. एकूण हे पाच मतदारसंघ केवळ महाराष्ट्रच नव्हे तर देशाचं लक्ष वेधतील आणि या पाच मतदारसंघाच्या निकालावरच महाराष्ट्राचं भवितव्य ठरेल.

शिंदेंप्रमाणेच अजित पवारांनीसुद्धा नवाब मलिक यांना उमेदवारी देताना भाजपच्या विरोधाची पर्वा केली नाही. १९९८ पासून आमदार असलेले नवाब मलिक मानखुर्द शिवाजी नगर मतदारसंघात लढत आहेत. भाजपने त्यांचा प्रचार करणार नाही असं जरी म्हटलं असलं तरीही अजित पवार नवाब मलिक यांच्या उमेदवारीवर ठाम आहेत. एकूणच माहीम आणि मानखुर्द शिवाजी नगर या दोन जागांवर झालेल्या वादाने भाजपला त्याचे मित्र पक्ष फारशी किंमत देत नाहीत हे स्पष्ट दिसत आहे

राष्ट्रवादी (शरद पवार) गटात बंडखोरी कमी आहे. त्यातच पवारांनी त्यांना अनुकूल असलेले मतदारसंघ आपल्याकडे ठेवल्याने त्यांना विजयाची खात्री आहे. उद्धव ठाकरे यांनी मुंबई, कोकण या आपल्या वर्चस्वाच्या भागावर लक्ष केंद्रित केलं आहे. त्यांना या भागात बंडखोरीचा सामना त्यामानाने कमी करावा लागत आहे. कॉंग्रेसचा भर मुख्यत्वे विदर्भावर आहे. कॉंग्रेसला एकूण मिळणाऱ्या जागांपैकी अर्ध्या विदर्भातून मिळतील असा अंदाज आहे. त्यामुळे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले विदर्भावर जास्त जोर देत आहेत. पण त्याचमुळे कॉंग्रेसचं राज्यातील नेतृत्व अनेक ठिकाणी कमी पडलं असं वाटतं. कोल्हापूरमध्ये पक्षाचा उमेदवार नसणं ही नामुष्की योग्य नियोजन नसल्यामुळे आणि प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या एककल्ली कारभारामुळे झाली. तरीही पक्षाने वेळेवर राजेश लाटकर यांना समर्थन देऊन बाजू सावरण्याचा प्रयत्न केला. पण पक्षाचा उमेदवार नसणं नामुष्की आहे. आणि पक्षाच्या पुढील वाटचालीत अशा चुका नसतील याची काळजी घेतली जाईल ही अपेक्षा! तूर्तास इतकेच!

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## अवकाश

# खरंच ग्रह-ताऱ्यांचा मानवावर प्रभाव पडतो का ?




प्रा. सुरेश चोपणे
9822364473
खगोल अभ्यासक, अध्यक्ष- स्काय वॉच ग्रूप
(सदस्य, इंडियन सायन्स कॉंग्रेस, मराठी विज्ञान परिषद), चंद्रपूर


प्राचीन काळात प्रकाशाचे तेजस्वी स्त्रोत नसल्यामुळे रात्री गडद अंधार असायचा, त्यामुळे रात्री संपूर्ण आकाश तेजस्वी ताऱ्यांनी आणि प्रकाशमय ग्रहांनी उजळून निघायचे. विविध रंगाचे ग्रह-तारे मानवाचे मन मोहून टाकायचे तर मध्येच येणारे धुमकेतू, उल्का वर्षाव आणि लालभडक ग्रह-तारे ह्याची भीतीसुद्धा वाटायची. अशा ह्या अफाट ग्रह-ताऱ्याच्या विश्वात नक्कीच कुणीतरी निर्माता आहे आणि तोच हे विश्व चालवतो आणि जीवनात घडणाऱ्या चांगल्या आणि वाईट घटनावर त्यांचेच नियंत्रण असावे असे लोकांना वाटायचे. त्याचप्रमाणे निघणारा सूर्य आणि चंद्रामुळे होणारा दिवस आणि रात्र, पाऊस, विजा, महापूर अशा अनेक नैसर्गिक घडामोडीमुळे विश्वाला चालविणारा कुणीतरी आहे आणि त्याची प्रार्थना केली तर ह्यातून सुटका होऊ शकते असे मानवाला वाटत असे. यातूनच गेल्या हजारो वर्षांपासून अनेक देशातील प्राचीन संस्कृतीत निसर्गपूजा सुरु झाली. सूर्य-चंद्र, ग्रह-ताऱ्यांचा मानवी जीवनावर प्रभाव पडतोच असे प्राचीन लोक मानू लागले. अनेक चिकित्सक तज्ज्ञांनी अवकाशाचा आणि निसर्गाचा अभ्यास करून तत्कालीन समाज गैरसमज आणि माहितीच्या आधारे तत्त्वज्ञान मांडले. ह्यातूनच भारतात ज्योतिष निर्माण झाले. आणि आजही आधुनिक, वैज्ञानिक काळात तेच तत्त्वज्ञान खरे असल्याचे मानू लागलो. कुठलेही प्राचीन तत्त्वज्ञान, धार्मिक ग्रंथ हे खरेच आहे किंवा खोटेच आहे म्हणणे हे सद्सद्विवेक बुद्धीला धरून नाही परंतु शास्त्रीय आणि वैज्ञानिक आधारावर खरंच ग्रह-ताऱ्यांचा सजीव सृष्टीवर चांगला-वाईट परिणाम होतो का, ह्याचे सविस्तर संशोधन होण्याची गरज आहे,

प्राचीन तत्त्वज्ञान - खगोलशास्त्र हे जगातले पहिले निसर्ग शास्त्र असावे ज्याचा अभ्यास तत्त्ववेत्यांनी करण्याचा प्रयत्न केला. बाबिलोनिया; मेसोपोटामिया, इजिप्त, ग्रीस, भारत, चीन आणि मध्य अमेरिका अशा अनेक संस्कृतीत खगोल विषयावर साहित्य लिहिल्या गेले. हिप्पार्चस, प्लोटेमी, अरिस्टारचस, ॲरिस्टोटल टायको ब्राहे, पायथोगोरस अश्या अनेक तत्वज्ञांनी तर भारतातील आर्यभट, ब्रम्हगुप्त, भास्कर, वराहमिहीर अशा संशोधकांनी आकाशातील ग्रह-तारे, सूर्य, पृथ्वी ह्याच्या भ्रमणाबद्दल तर्काच्या आणि निरीक्षणाच्या आधारे मते मांडली आणि सिद्धांत मांडलेल्या अर्थाने आजच्या खगोल शास्त्राचा पाया ह्याच लोकांनी रचला असे म्हणता येईल. परंतु पुढे अनेक वर्षे संशोधने होत राहिली आणि ज्योतिषापासून खगोल शास्त्र तयार झाले. अजूनही खगोल शास्त्रात नवनवे संशोधने सुरूच असून भविष्यात अनेक नव्या ज्ञानात भर पडत जाणार आहे.

ग्रह-ताऱ्याबद्दल समज-गैरसमज- प्राचीन काळात ताऱ्यांच्या प्राणीसदृश्य आकृत्या, वस्तू दिसल्यामुळे त्या राशींना कुंभ, वृषभ, कन्या, मेष इ नावे दिली होती. भारतात त्या राशीत येणारा ग्रह हा त्या राशीत मानला गेला, तर ठळक ताऱ्यांना नक्षत्र मानले गेले आहे. खरंतर ह्या सर्व ग्रह ताऱ्यांच्या स्थितीनुसार राशी नक्षत्र मानले गेले असून त्या त्या राशीनुसार त्या त्या व्यक्तींचे अंदाजे भविष्य सांगितले जाते, ह्यालाच ज्योतिष असे म्हणतात. हे भविष्य किंवा अंदाज आहेत इथपर्यंत ठीक आहे परंतु हेच सत्य असून ते विज्ञानाच्या आधारावर खरे आहे असे म्हणणे अवैज्ञानिक आणि चुकीचे आहे. आजही वैज्ञानिक युगात आपण ग्रह-तारे आणि ग्रहणे ह्याविषयी अंधश्रद्धा बाळगतो. त्यातील काही अंधश्रद्धा किंवा समज-गैरसमज असे की ग्रहणात बाहेर निघू नये, गर्भार स्त्रियांनी ग्रहण पाहू नये, ग्रहणात खाऊ पिऊ नये. ग्रहण मनुष्यासाठी अशुभ असते, मंगळ हा अशुभ असून मंगळी मुलींचे त्यामुळे लग्न जुळत नाही, शनी ग्रहसुद्धा अशुभ असून त्याचासुद्धा जीवनावर विपरीत परिणाम होतो. ग्रहू केतू सूर्याला गिळंकृत करतात. ह्याउलट गुरु, शुक्र ग्रह हा शुभ असून जीवनात चांगल्या गोष्टी घडवून आणतो तर काही ग्रह आणि नक्षत्र शुभ मानले गेले आहे. प्राचीन काळात मंगळासारख्या लाल रंगांना धोकादायक तर गुरु-शुक्राच्या शुभ्र रंगांना चांगले मानले गेले होते, त्याचीच प्रचिती ज्योतिषात सुद्धा दिसते.

इतर सजीवांवर ग्रह-ताऱ्यांचा परिणाम होतो का ?- ज्योतिष हे केवळ मानवासाठी आहे की सर्व प्राणिमात्रासाठी आहे ? ग्रह-ताऱ्यांचा प्रभाव हा सूक्ष्म पातळीवर सर्व सजीवावर सारखाच होत असतो. परंतु ज्योतिषाचा विचार आपण केवळ मानवासाठीच करतो. जर इतर सजीवावर हा परिणाम होत असेल तर त्यांचे जीवन कोण नियंत्रित करते ? निश्चितच ग्रह-ताऱ्याच्या गुरुत्वाचा अगदी अल्प प्रमाणात परिणाम मानवासोबतच सर्व सजीवावरसुद्धा होत असतो परंतु हा परिणाम अगदी नगन्य असतो. खरंतर हे विश्व सजीवासाठी सारखेच परिणामकारक असून ग्रह-तारे जरी परिणाम करीत असेल तरी त्यावर कोणताही मानवी उपाय नाही. कोणताही प्राणी असा उपाय शोधतही नाही. ज्योतिष वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध होणे गरजेचे- कुठलेही प्राचीन व्यावहारिक ज्ञान उपयोगी असते परंतु वैज्ञानिक ज्ञान हे काळानुसार आणि मिळालेल्या पुराव्यानुसार बदलत असते. प्राचीन ज्योतिष हे त्या काळात उपलब्ध ज्ञानानुसार होते परंतु तेव्हापासून आजतागायत वैज्ञानिक प्रगती झाली, दुर्बिणी आल्या, गुरुत्व, विकिरणे मोजण्याची यंत्रणा उपलब्ध झाली. पूर्वी ती नव्हती, ज्योतिषाला जगात कुठेही शास्त्र आणि विज्ञान म्हणून मान्यता नाही. ह्यावर अनेक वैज्ञानिकात वाद आहे. प्राचीन ज्ञान हे निश्चितच उपयोगी आहे परंतु ते विज्ञानाच्या



कसोटीवर सिद्ध झाले पाहिजे. ज्योतिषाला विज्ञान मानायचे असेल तर प्रत्येकवेळी एकाच राशीच्या १०० लोकांचे भविष्य अगदी एकसारखेच येतात काय, असे सिद्ध करून दाखविले पाहिजे, संशोधन/ पी.एच.डी करताना जी संशोधन पद्धती आपण वापरतो तीच पद्धत वापरून ज्योतिषाला शास्त्र किंवा विज्ञान मानण्यासाठी वापरली पाहिजे. ज्योतिष संघटनांनी असा प्रयत्न करावा. वैज्ञानिक दृष्टीकोन महत्त्वाचा- आज जगातील अनेक देशात वैज्ञानिक दृष्टीकोणाचा अभाव आढळतो. जिथे धार्मिक कट्टरता असते तिथे ज्ञानापेक्षा भावनेला महत्व असते. ग्रह-तारे निश्चितच सूक्ष्म प्रमाणात सर्व वृक्ष-वेली आणि सजीव सृष्टीवर परिणाम करतात परंतु ह्याचा प्रभाव कुणालाच कमी करता येत नाही. नैसर्गिकरित्या मानव आणि सजीवावर सर्वाधिक परिणाम पृथ्वीच्या प्रचंड गुरुत्वाचा होत असल्याने इतर कोणत्याही ग्रह-ताऱ्यांचा प्रभाव सजीवावर नगण्य होतो. तसेच सूर्य आणि चंद्राचा प्रभाव हा जमीन आणि समुद्रासारख्या मोठ्या घटकावर होतो. लहान तळे, धरणे ह्यावर होत नसल्यामुळेच त्यांना भरती येत नाही. म्हणूनच ज्या काही अंधश्रद्धा जगात आहेत त्यावर संशोधन झाले पाहिजे आणि म्हणूनच कुठल्याही प्राचीन तत्त्वज्ञानावर आंधळेपणे विश्वास न ठेवता त्याची सत्यता तपासली पाहिजे आणि नंतरच विश्वास ठेवला पाहिजे. ग्रह-ताऱ्यांचा खरंच मानवावर परिणाम होतो का ते प्रयोगाच्या आधारे सिद्ध झाले पाहिजे.

## प्रासंगिक

# मतदानाचा हक्क बजावू या...




सचिन चव्हाण
9158393260


लोकशाही ही आपल्या देशातील सर्वात मोठी आणि मौल्यवान देणगी आहे. प्रत्येक नागरिकाला आपल्या देशाच्या भविष्याची दिशा ठरवण्याचा अधिकार मिळावा, ही कल्पना लोकशाहीच्या केंद्रस्थानी आहे. लोकशाहीमध्ये सर्वसामान्यांना सरकार निवडण्याचा हक्क असतो. आपल्या देशात मतदान हक्क हा प्रत्येक सजग नागरिकाचा मौलिक हक्क आहे. हा हक्क फक्त अधिकार नसून एक जबाबदारीही आहे. देशाच्या प्रगतीसाठी, समाजाच्या भल्यासाठी आणि योग्य नेतृत्व निवडण्यासाठी मतदान करणे महत्त्वाचे आहे. मतदानाचा हक्क ही लोकशाही व्यवस्थेची आधारशिला आहे. नागरिकांनी या प्रक्रियेत भाग घेतला नाही, तर लोकशाहीचा गाभाच नष्ट होईल. प्रत्येक मत ही एक ताकद आहे, जी योग्य आणि प्रामाणिक नेतृत्व निवडण्यासाठी वापरता येते. एकेकाळी ब्रिटन, फ्रान्ससारख्या देशातदेखील सर्वांना मतदानाचा हक्क नव्हता. भारतात मात्र संविधानाने प्रत्येक प्रौढ नागरिकाला, त्याचा धर्म, जात, लिंग किंवा वर्ग यांच्याशी संबंध न ठेवता मतदानाचा अधिकार दिला आहे. ही संधी आपल्या संविधानामुळे मिळाली आहे, म्हणूनच आपल्याला तिचा आदर ठेवून मतदान करणे आवश्यक आहे.

मतदान प्रक्रियेत सहभागी होणे ही प्रत्येक नागरिकाची राष्ट्रीय जबाबदारी आहे. आपण मतदान करूनच आपल्या समस्यांना योग्य न्याय मिळू शकतो. जर योग्य लोक निवडले गेले तर लोकांचे प्रश्न सोडवले जातील, देशाचा विकास होईल. आजही आपल्या देशात अनेक विकासात्मक समस्या, शिक्षण, आरोग्य, रोजगार यासारख्या क्षेत्रात अडथळे आहेत. या सर्व अडचणी दूर करण्यासाठी एक जबाबदार आणि कर्तव्यदक्ष नेतृत्व निवडणे गरजेचे आहे आणि त्यासाठीच आपण मतदान करणे आवश्यक आहे. अनेकदा लोक विचार करतात की, 'माझ्या एक मताने काय फरक पडतो?' परंतु सत्य हे आहे की अनेक ठिकाणी एक एक मत निर्णायक ठरते. काही निवडणुकांमध्ये लहानसा फरक हा निकाल ठरवतो. मतदान न करणारे नागरिक नकारात्मक भूमिका घेतात, ज्यामुळे ते देशाच्या विकासात सहभागी होत नाहीत. जेव्हा लोक मतदान करत नाहीत, तेव्हा अयोग्य लोक सत्तेत येण्याची शक्यता वाढते. त्यामुळे आपण जर योग्य नेत्यांना निवडले नाही तर त्याचा फटका समाजालाच बसतो. आज भारताची तरुण पिढी मोठ्या संख्येने आहे. या पिढीची जबाबदारी खूप मोठी आहे, कारण आजची तरुणाईच देशाचे भविष्य आहे. त्यामुळे त्यांचा मतदानात सहभाग असणे अत्यंत आवश्यक आहे. अनेकदा तरुण वर्गाला असे वाटते की राजकारणात त्यांच्या मतांचा फारसा अर्थ नाही; परंतु त्यांचे हे विचार चुकीचे आहेत. तरुणांनी प्रगल्भता दाखवून मतदानाचा हक्क बजवायला हवा, कारण त्यांचे निर्णयच उद्याच्या देशाची दिशा ठरवतील. आजच्या काळात तंत्रज्ञानाने मतदान प्रक्रियेत नवे बदल आणले आहेत. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणा (ईव्हीएम) व व्हीव्हीपीएटी सारख्या तंत्रज्ञानामुळे मतदान करणे अधिक सोयीचे आणि सुरक्षित झाले आहे. त्यामुळे पारदर्शकता व कार्यक्षमता वाढली आहे. यामुळे निवडणूक प्रक्रियेवर विश्वास वाढला आहे; परंतु या सुविधांचा पुरेपूर लाभ घेण्यासाठी नागरिकांनी मतदार नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून आपली भूमिका बजवावी. मतदानासाठी जनजागृती अभियान हे एक प्रभावी साधन आहे. शासन विविध मोहिमा राबवते, जसे की 'जागो रे', 'मतदान महोत्सव' इत्यादी, ज्यामुळे नागरिकांना मतदानाची गरज आणि महत्त्व पटवले जाते. याशिवाय शाळा, महाविद्यालये, विविध सामाजिक संस्था आणि स्थानिक प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नांनी मतदानाची जनजागृती अधिक प्रभावी होते. प्रत्येकाने आपल्या परीने मतदानाचा प्रचार आणि प्रसार केला पाहिजे.

मतदान हा फक्त हक्क नाही, तर तो एक पवित्र कर्तव्य आहे. देशाच्या विकासासाठी, समाजाच्या प्रगतीसाठी आपण मतदान करणे आवश्यक आहे. आपले मत एका चांगल्या नेत्याची निवड करू शकते, ज्यामुळे आपल्या देशाची प्रगती होईल. मतदान न करणे ही देशासाठी घातक गोष्ट आहे, कारण हे आपल्याच भविष्यात अडथळा निर्माण करते. आपण योग्य नेते निवडू शकतो, जे देशाच्या प्रगतीसाठी कटिबद्ध असतील. त्यामुळे 'मतदान करूया, देशाचे भविष्य घडवूया' हाच संदेश आपण सर्वांनी पसरवला पाहिजे.

रामटेक, जि. नागपूर
sachinbchavan88@gmail.com

## वाचक विचार मंच

### योजना लाभार्थीपर्यंत पोहोचल्या पाहिजेत!

देशात प्रगतीचा लाभ विकास योजनांच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचवला जात असतो. यामुळे विकास योजना लोकाभिमुख असणे व त्यांच्या अंमलबजावणीत पारदर्शिकता असणे गरजेचे आहे. माञ राज्य आणि केंद्र सरकारच्या योजनांचा लाभ ज्या प्रमाणात पाहिजे त्या प्रमाणात लोकांपर्यंत पोहचू शकला नाही. यामध्ये प्रशासनाचा हलगर्जीपणा स्पष्ट दिसून येतो. एक तर काही योजनांची लोकांना पुरेशी माहिती नसते. दुसरे म्हणजे योजनांचा लाभ घेण्यासाठी डझनभर अटींचा भडिमार केलेला असतो. यामुळे स्वाभाविकच गरीब लाभार्थी योजनांतील लाभांकडे दुर्लक्ष करतो. उलट सरकारी योजनांचा लाभ केवळ शिक्षित लोक घेतांना दिसत आहे. योजना लोकाभिमुख असतात, मात्र शासकीय यंत्रणाच त्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात अपयशी ठरते आहे. शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी ना शेतरस्ता बरोबर आहे, ना पावसाळ्यात शेतातील साचलेले पाणी जाण्यासाठी शेतनाला? यामुळे अनेक शेतकऱ्यांचे दरवर्षी मोठ्या प्रमाणात शेतीचे व पिकाचेही नुकसान होते आहे. अद्यापही अनेक शेतकरी मदतीपासून वंचित आहेत. यामुळे वेळोवेळी गावा-गावात कृषीविषयक कार्यशाळा घेऊन सर्व शासकीय योजनांची माहिती, लाभ लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम कृषी विभागाने, शासनाने तत्परतेने करायला हवे, जेणेकरून सरकारी योजनांचा खरा लाभ गरजू व योग्य लाभार्थीपर्यंत पोहोचेल, हे मात्र नक्की.

**सचिन जगन नागरे**
किनगाव जट्टु, ता.लोणार, जि. बुलढाणा
मो. नं. ९६०४३२१४३२

### भाव न करता खरेदी करावी!

अनेक ठिकाणी वयोवृद्ध व्यक्ती सिझननुसार काही वस्तू विकताना दिसतात. या व्यक्ती आर्थिक अडचणीमुळे किंवा तब्येत ठीक नसतानासुद्धा काम करताना दिसतात, तेव्हा भाव कमी न करता अशा व्यक्तीकडून खरेदी करावी. मॉलमध्ये खरेदी करताना तिथे उधारी चालत नाही, जो दर असेल त्यानुसार खरेदी करावी लागते. फसवे डिस्काउंट, ऑफर्स असतात.

**प्र.मु.काळे**
मो.नं.: ९२७३०४५७९४

## धमाल

### दुरावा

पाडव्याला 'घड्याळा'चे
'काटे' 'वाडी'त उलटे फिरले
रक्ताच्या नात्यांमध्ये
वारे मतभेदांचे शिरले

भाऊबीजेला माझा 'दादा'
'लाडक्या बहीणी' साठी येईल
'ताई' म्हणाल्या पूर्वीसारखे
प्रेमाने ओवाळून घेईल

'शरदा'च्या चांदण्यात
नक्कीच फुलणार 'गोविंदबाग'
दिपावलीच्या मुहुर्तावर
मनातील संपणार राग

तेव्हा पित्याच्या 'तुतारी'चा
कानावर पडला हा ध्वनी
नको वाट पाहू पोरी
आता येणार नाही कुणी

दरमहा पंधराशे
पडत राहतील खात्यात
पण जिव्हाळ्याचा बॅलन्स
निल झाला रक्ताच्या नात्यात

गृहकलहामुळे नक्कीच
माया-ममतेत होते घट
बुलंद बुरूजालासुध्दा
कधी ना कधी पडते फट

ह्याला अपवाद असणारे
कुणी आम्हाला भेटले नाही
असं कोणते घर आहे
जे आजवर फुटले नाही ?

**ॲड. अनंत खेळकर**
अकोला

## संवाद

### अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष कोण होणार? साऱ्या जगाचे लक्ष...


जगातील महासत्ता असलेल्या अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी नुकताच मतदान झाले आहे. या निवडणुकीत डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस व रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांच्यात थेट लढत झाली असल्याने ही निवडणूक विविध अंगानी गाजली आहे. या निवडणुकीत जिंकणारा उमेदवार अमेरिकेचा ४७ वा राष्ट्राध्यक्ष बनेल. या निवडणुकीमध्ये समोर आलेले मुद्दे विचार करायला लावणारे होते. बिघडलेली अर्थव्यवस्था, वाढती बेकारी, स्थलांतरितांचा बिकट प्रश्न, लोकशाहीचे भवितव्य, आरोग्य व्यवस्था, महागडे व खर्चिक शिक्षण, फसलेले परराष्ट्र धोरण यासारख्या ज्वलंत प्रश्नांनी निवडणूक गाजली आहे, त्यामुळे या निकालाकडे साऱ्या जगाचे लक्ष लागून राहिले आहे पुरोगामी डाव्या विचारांच्या कमला हॅरिस विजयी होतील की सनातनी विचारांचे डोनाल्ड ट्रम्प अध्यक्षपदी पुन्हा विराजमान होतील हे जरी आता सांगणे कठीण असले, तरी आगामी काळात याचे उत्तर मिळणार आहे. कमला हॅरिस आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रचारमोहिमेतील मुद्दे आणि त्यावर झालेले विचारमंथन अत्यंत महत्त्वाचे आहे. अमेरिकेच्या निवडणुकीत जेवढे लोकशिक्षण होते तेवढे खचितच जगाच्या इतर देशात होत असेल. जात, धर्म, प्रदेश यापेक्षाही देशापुढील विकासाचे मुद्दे निवडणुकीत चर्चिले गेले पाहिजेत. वैचारिक मुद्यावर उहापोह झाला पाहिजे ही भुमिका महत्त्वाची आहे.

जगातील पहिल्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असणाऱ्या अमेरिकेला नवीन राष्ट्राध्यक्ष निवड देशाला वेगळी कलाटणी देऊ शकतो त्यामुळे या निवडणुकीला महत्व आले आहे. नवीन राष्ट्राध्यक्ष आपल्या दृष्टिकोनातून परराष्ट्र धोरण तयार करेल, त्याचे परिणाम जगावर उमटतील. कमला हॅरिस यांच्यासोबत उपराष्ट्राध्यक्ष पदासाठी टीम वाल्ज, तर डोनाल्ड ट्रम्प यांच्यासाठी जे. डी. वेन्स हे रणांगणात आहेत अमेरिकेची निवडणूक ५ नोव्हेंबर रोजी झाली असून त्याचा निकाल ६ जानेवारी २०२५ रोजी लागणार असून २० जानेवारी २०२५ रोजी नवे अध्यक्ष महोदय व त्यांचे सोबती उपाध्यक्ष व्हाईट हाऊसमध्ये राष्ट्राची सूत्रे हाती घेतील आणि अमेरिकेच्या इतिहासातील नवे पान लिहिले जाईल ४७ वे अध्यक्ष आणि ५० वे उपाध्यक्ष कोण होतील हे आता भविष्याच्या उदरात स्पष्ट होणार आहे, त्यामुळे सध्यातरी वेट अँड वॉच !

**राजू जाधव**
मांगूर जि. बेळगांव

## गुल्लेर

# गरीब जिंदा रहे...




नरेंद्र इंगळे
9561226572


'क्या नाम है आपका? '

'कादीरभाई भंगारवाले.'

'आप किसको वोट दे रहे है?'

'अपन कांग्रेसके सिवाई किसीको देतेच नही. बचपनसे कांग्रेस.'

'तुम्हारे एरीयामे शिंदेका उमेदवार खडा है, उसको त्यांनी नही देते? '

'शिंदेने क्या किया? लाडकी बहन निकाली.. लाडके भैया रिकामे घुम रहे.. महंगाई भलकुची हो गयी. साला तेल दिडसोके उपर गया.. मेरे सरीखा भंगार जमा करनेवाला आदमी क्या खायेगा? अब लोग भंगारभी नही बेचते.'

'क्यों नही बेचते?'

'उनको लगता की सोनेके भाव बढ गये... कुछ दिनो बाद भंगारके भावभी बढ जायेंगे.'

'समस्या क्या है तुमारे इलाकेमे? '

'अब क्या बताना.. एक होती तो बताता.. घरपर गया तो घरवाली परेशान करती.. बाहर बैठा तो उधारीवाले परेशान करते.'

' मतलब तुमने बहोत उधारी करके रखी क्या?'

' बहोत लोगोकी उधारी है मेरे आंगपर.. दुकानदार खडाभी नही करता..'

'इतनी उधारी कैसे हुयी? '

'सीधी बात है.. इन्कम कम हौर महंगाई जादा.. मटनके भाव कैसे के कैसे हो गये.'

'लाडकी बहनके पैसे मिलते होंगे घरवालीको? '

'कायके पैसे? वो तो इस्कुलमे गयीच नही.. टीसी नही उसके पास.. उमरके वास्ते टीसी होना बोलते.'

'बच्चे तो जाते होंगे सरकारी स्कुलमे? '

'बच्चे जाते मगर इस्कुलमे मास्टर नही.. नल है तो पानी नही.. सरकारी दवाखानेमे डाक्टर नही.. मेरेकू हो गया इसबगोल.. घरवाली बोलती पहले इलाज करो बादमे घरपे आवो.. अब क्या बोलना?'

' घरकूल योजना का फायदा मिला क्या?'

'फायदा तो मिला था.. लेकीन वो बडा भाई बीबी बच्चोके साथ आ टपका.. उसने कब्जा किया.'

'अब तुम कहां रहते? '

'है अपना गरीबका ताजमहाल..! ऐसी सरकार होना की गरीब जिंदा रहे.. उधर वो अदानी रोजके करोडो कमाता और इधर भंगारपर जिंदगी कट रही.. गरीब अमीरकी दुरी हटना चाहीये.. बस ऐसी सरकार लाना है.'



## सर्वोच्च न्यायालयाचा योगी आदित्यनाथ सरकारला धक्का

# मदरसा शिक्षण मंडळ कायदा घटनात्मक

**नवी दिल्ली :** उत्तर प्रदेश मदरसा शिक्षण मंडळ कायदा, २००४ रद्द ठरवण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार देत या कायद्याची घटनात्मक तरतूद कायम असल्याचा निर्वाळा दिला. यामुळे मार्च महिन्यात अलाहाबाद उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाला अखेर स्थगिती मिळाली आहे. या कायद्यामुळे धर्मनिरपेक्ष तत्त्वाला तडा जात असल्याचे सांगून हा कायदा रद्द करण्याचा निर्णय उच्च न्यायालयाने दिला होता. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण गेले असता एप्रिल महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निकालाला अंतरिम स्थगिती दिली होती. यामुळे उत्तर प्रदेशमध्ये मदरशात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

मार्च महिन्यात उच्च न्यायालयाने सदर कायद्याला स्थगिती देऊन मदरशात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना इतर शाळांमध्ये दाखल होण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेले. उत्तर प्रदेश मदरसा शिक्षण मंडळ कायद्यामुळे एनसीईआरटीच्या अभ्यासक्रमासह धार्मिक शिक्षण देण्याचीही तरतूद आहे. या कायद्यानुसार मदरसा शिक्षण मंडळावर मुस्लीम सदस्यांची नियुक्ती केली जाते. कायद्याच्या कलम ९ मध्ये मंडळाचे काम कसे चालणार? याबाबत दिशानिर्देशन केले गेले आहे. अभ्यासक्रम कसा असेल? तसेच परीक्षा घेण्यासाठी मौलवींपासून ते फाजिलपर्यंत काय जबाबदाऱ्या आहेत? याची माहिती या कलमात आहे.

### पदवी देण्याचा अधिकार फेटाळला

सर्वोच्च न्यायालयाने कायदा घटनात्मक असल्याचा निर्वाळा दिला असला तरी फाजिल, कामिल सारख्या पदव्या देण्याचा अधिकार हा यूजीसी (विद्यापीठ अनुदान) कायद्याच्या विरोधात असल्याचे म्हटले आहे. पदवी प्रदान करण्याचा अधिकारी वैध नाही, बाकी कायदा घटनात्मक आहे, असे सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने म्हटले. सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडताना उत्तर प्रदेश सरकारने सांगितले की, या कायद्याला घटनात्मक आधार आहे. यावर सरन्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने सांगितले की, मदरशांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे ही चिंता असती तर मदरसा कायदा रद्द करणे हा त्यावरील उपाय नव्हता, तर विद्यार्थी दर्जेदार शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत याची खबरदारी घेण्यासाठी योग्य ते निर्देश देणे हा उपाय होता.

# कॅनडातल्या मंदिरांवरील हल्ल्याचा मोदींकडून निषेध

देशोन्नती वृत्तसंकलन

नवी दिल्ली : कॅनडातील हिंदू मंदिरावरील हल्ल्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीव्र शब्दात निषेध केला आहे. अशा कारवाया भारताचा संकल्प कमकुवत करू शकत नाहीत असे पंतप्रधान मोदींनी आपल्या ट्विटर (एक्स) संदेशात म्हंटले आहे. यासंदर्भात पंतप्रधान म्हणाले की, कॅनडामधील मंदिरांवर झालेल्या हल्ल्याच्या तीव्र निषेध करतो. तसेच भारतीय मुत्सद्यांना धमकावण्याचे प्रयत्न भयावह आहेत.



अशा प्रकारचा हिंसाचार भारताचा संकल्प कधीही कमकुवत करू शकत नाही. कॅनडा सरकारने न्याय सुनिश्चित करावा आणि कायद्याचे राज्य राखावे अशी आमची अपेक्षा आहे. कॅनडात सलग दुसऱ्या दिवशी खलिस्तान्यांनी तेथील हिंदू मंदिरावर हल्ला करून मंदिरात उपस्थित हिंदूंना जखमी केले. हल्ल्याच्या दुसऱ्या दिवशी मंदिर परिसरात आणि परिसरात पोलीस उपस्थित होते, असा आरोप पीडितांनी केला आहे. मात्र त्यानंतरही त्याच्यावर हल्ला झाला. यापार्श्वभूमीवर पंतप्रधानांची प्रतिक्रिया जागतिक पातळीवर महत्त्वाची मानली जाते. परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदन जारी करत म्हंटले की, कॅनडातील भारतीय नागरिकांच्या सुरक्षेबाबत नवी दिल्ली गंभीरपणे चिंतेत आहे. भारत ब्रॅम्प्टन, ओंटारियो येथील हिंदू सभा मंदिरात अतिरेकी आणि फुटीरतावाद्यांनी केलेल्या हिंसाचाराचा निषेध करतो. आम्ही कॅनडा सरकारला अशा हल्ल्यांपासून सर्व प्रार्थनास्थळांचे संरक्षण करण्याची विनंती करतो. हिंसाचार करणाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे असे परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी म्हंटले आहे.

# रायगड जिल्ह्यात ११ मतदान केंद्र अतिसंवेदनशील

**रायगड :** रायगड जिल्ह्यातील सात विधानसभा मतदार संघात येत्या २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून, या सर्व मतदार संघात एकुण २८२० मतदान केंद्रे असून, त्यांच्या सुरक्षा विषयक आढावा पोलीस व निवडणूक यंत्रणेने संयूक्तरित्या घेतला असून, पूर्वइतिहासाच्या पार्श्वभूमीवर यांतील ११ मतदान केंद्रे अतिसंवेदनशील म्हणून घोषीत करण्यात आली आहेत. या सर्व अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर विशेष पोलीस बंदोबस्त तैनात करण्याचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा निवडणूक यंत्रणेने दिली आहे. अतिसंवेदनशिल ११ मतदान केंद्रांपैकी १० मतदान केंद्रे १९१-पेण विधानसभा मतदार संघात



आहेत तर एक मतदान केंद्र १९३-श्रीवर्धन विधानसभा मतदार केंद्रात आहे. पेण विधानसभा मतदार संघातील या १० अतिसंवेदनशील मतदान केंद्रांमध्ये ६-जाभूळवाडी, ७-घोटे, ८-जावळी, ९-निफाड, १०-करोडी, ३३-निधवली, ४३-वाशिवली, ६४-वरसई-१, ६५-वरसई-२ आणि ६६-वरसई-३ या मतदान केंद्राचा समावेश आहे.


# उड्डाण क्षेत्रामुळे महिलांच्या प्रगतीला पाठबळ - राष्ट्रपती

**नवी दिल्ली :** भारत सरकारच्या सर्वसमावेशक प्रयत्नांमुळे नागरी विमान वाहतूक क्षेत्रातील महिलांच्या प्रगतीला पाठबळ मिळाले आहे. अधिकाधिक महिला करियरसाठी आता विमान वाहतूक क्षेत्राकडे आकर्षित होत आहेत. उड्डाण क्षेत्रातील महिलांच्या वाढत्या सहभागासोबतच त्यांना समान संधी मिळणे हे देखील महत्वाचे असल्याचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या. राष्ट्रपती भवनात सोमवारी ४ नोव्हेंबर रोजी भारतीय विमान वाहतूक क्षेत्रातील यशस्वी महिला अधिकाऱ्यांशी संवाद साधला. जनतेबरोबर दृढ संबंध प्रस्थापित करणे आणि त्यांच्या योगदानाची प्रशंसा करणे हा उद्देश असेलल्या

### द प्रेसिडेंट विथ द पीपल उपक्रम



'द प्रेसिडेंट विथ द पीपल' या उपक्रमाअंतर्गत ही भेट झाली. भारताच्या नागरी विमान वाहतूक क्षेत्रात महिला विविध परिचालन व तांत्रिक बाबतीत महत्वाची भूमिका बजावत आहेत, असे राष्ट्रपती या प्रसंगी म्हणाल्या. हवाई वाहतूक नियंत्रण (ऊण) जबाबदारी पार पाडणाऱ्या १५ टक्के महिला आहेत, तर ११ टक्के फ्लाईट डिस्पॅचर्स व ९ टक्के एरोस्पेस इंजिनिअर्स या महिला आहेत असे निरीक्षण राष्ट्रपतींनी नोंदवले. गेल्या वर्षी वाणिज्यिक उड्डाण परवाने मिळालेल्या वैमानिकांपैकी १८ टक्के महिला असल्याचं त्यांनी सांगितलं. नवनवीन वाटा चोखाळण्याचे धैर्य दाखवणाऱ्या व नवीन कल्पना राबवणाऱ्या या यशस्वी महिलांचे त्यांनी कौतुक केले. योग्य शिक्षण व प्रशिक्षणासोबत कुटुंबाचा पाठिंबा देखील आवश्यक आहे असे त्या म्हणाल्या. अनेक उच्चशिक्षित महिला केवळ कुटुंबाचा पाठिंबा नसल्यामुळे करियरची स्वप्ने पूर्ण करू शकत नाहीत असे दिसून येते. त्यांनी या यशस्वी महिलांना इतर महिलांना करियरची निवड तसेच प्रगतीसाठी मार्गदर्शन करून त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले.



**हमीरपूर:** हिमाचल प्रदेशच्या हमीरपूरमध्ये एक असे गाव आहे जेथे दिवाळी साजरी करण्यात येत नाही. सम्मू गावात अनेक वर्षांपासून दिवाळी साजरी करणे तर दूरच राहिले, त्या दिवशी घरात पक्वानं देखील तयार करण्यात येत नाहीत. गावाला एक शाप असल्यानेच येथे दिवाळी साजरी केली जात नाही असे गावकरी सांगतात.

# फटाक्याच्या बॉक्सवर बसवल्याने तरूणाचा मृत्यू

### मित्रांनी केलेली मस्करी जिवावर बेतली

देशोन्नती वृत्तसंकलन

**बेंगळुरू :** दिवाळीच्या मुहूर्तावर काही मुलांनी त्यांच्या मित्रासोबत मस्करी केली त्यातच त्याला जीव गमवावा लागला. घटना बेंगळुरूची आहे. ३२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. इथे एक बेरोजगार मुलगा फटाक्यांच्या डब्यावर बसून त्याच्या चांगल्या भविष्याची पैज लावत होता. त्यानंतर मित्रांनी खालून आग लावली आणि स्वतः एक एक करून पळ काढला. डब्याला आग लागताच मोठा स्फोट झाला आणि त्यात बसलेला तरुण खाली पडला. यानंतर त्यांचा मृत्यू झाला. या घटनेचा सीसीटीव्ही व्हिडिओ समोर आला आहे. ज्यामध्ये काही मुले एका तरुणाला फटाक्यांच्या डब्यावर बसवतात आणि पळून जाताना दिसतात. त्यानंतर स्फोट होतो आणि ती व्यक्ती पडते. यानंतर धुराचे ढग पसरतात.

# हत्तीच्या केसांचे दागिने विकणाऱ्या पुण्यातील सराफाविरुद्ध गुन्हा दाखल

देशोन्नती वृत्तसंकलन



**पुणे :** हत्तीच्या केसांपासून तयार करण्यात आलेले ब्रेसलेट्स, तसेच अंगठ्यांची विक्री केल्याच्या आरोपावरून विश्रामबाग पोलिसांनी शहरातील एका सराफ व्यावसायिकाविरुद्ध वन्यजीव कायद्यान्वये गुन्हा दाखल केला. त्याच्या दुकानातून जप्त करण्यात आलेले दागिने पडताळणीसाठी वन विभागाच्या पथकाकडे सोपविण्यात आले आहेत.

हत्तीचे केस बाळगणे, तसेच विक्री करणे हा वन्यजीव कायद्याने गुन्हा आहे. हत्तीच्या केसांचे दागिने बनवून त्याची विक्री केल्याच्या आरोपावरून कुमठेकर रस्त्यावरील व्ही. आर. घोडके सराफ या पेढीच्या मालकांविरुद्ध विश्रामबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका वन्यजीवप्रेमी सामाजिक कार्यकर्त्याने विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. हत्तीचे केस धारण केल्याने शक्ती आणि संरक्षण मिळते, अशी धारणा दक्षिणेकडील नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे दक्षिणेकडील राज्यात हत्तींच्या केसांपासून तयार करण्यात आलेले ब्रेसलेट आणि अंगठ्या वापरण्याचे प्रमाण मोठे आहे. गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्रातही हत्तीच्या केसांपासून तयार करण्यात आलेले ब्रेसलेट आणि अंगठ्या वापरण्याचे प्रमाण वाढीस लागले आहे. कुमठेकर रस्त्यावरील के. व्ही. घोडके सराफ पेढीकडून हत्तीच्या केसांचे ब्रेसलेट्स आणि अंगठ्यांची विक्री केली जात होती. याबाबत रेडिओवर जाहिरातही प्रसारित करण्यात आली होती. ही जाहिरात ऐकून एका वन्यप्रेमीने बनावट ग्राहक पाठवून अंगठीची खरेदी केली. अंगठी तपासून पाहिली. तेव्हा अंगठीत हत्तीचे केस आढळून आले. त्यानंतर वन्यजीव प्रेमी कार्यकर्त्याने तक्रार केली. पोलिसांच्या पथकाने सराफी पेढीवर छापा टाकून तेथून हत्तीच्या केसांपासून तयार करण्यात आलेल्या अंगठ्या आणि ब्रेसलेट जप्त केली.

# भाजपने भूस्खलनावरही राजकारण केले

### प्रियंका गांधींनी साधला निशाणा

वृत्तसंस्था

**वायनाड :** काँग्रेस सरचिटणीस प्रियंका गांधी वायनाड लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवत आहे, जिथे राहुल गांधींनी जागा सोडल्यानंतर पोटनिवडणूक होत आहे. प्रचारादरम्यान त्या सातत्याने भाजपवर हल्लाबोल करत आहेत. प्रियांका गांधी यांनी भाजपवर हल्ला तीव्र करत सोमवारी सांगितले की, 'वायनाडमध्ये नुकत्याच झालेल्या भूस्खलनासारख्या मुद्द्यांवरही भाजपने राजकारण केले आहे. सुलतान बथेरी विधानसभा मतदारसंघातील केनिचिरा येथे एका पथ सभेला संबोधित करताना प्रियांका गांधी यांनी ही माहिती दिली. काँग्रेस सरचिटणीस प्रियंका गांधी



म्हणाल्या, 'लोकांना खूप त्रास देणाऱ्या आपत्तीचेही भाजपने राजकारण केले. आम्ही अशा ठिकाणी उभे आहोत जिथे तुम्हाला तुमच्या देशाचा विचार करावा लागेल. तुम्हाला तुमच्या गरजांचा विचार करावा लागेल. आणि तुम्हाला विचार करावा लागेल की तुम्हाला देशात कोणत्या प्रकारचे राजकारण हवे आहे. प्रियंका गांधी म्हणाल्या की, केंद्र सरकारने भूस्खलनामुळे बाधित कुटुंबांना मदतीचा हात पुढे केला नाही आणि गरजेनुसार मदत दिली नाही. भाजपचे राजकारण द्वेष, राग, फूट आणि विनाशाचे राजकारण आहे. जनतेला भेडसावणाऱ्या समस्यांवर चर्चा होत नसल्याने त्यांचे प्रश्न सोडवले जात नसल्याचे त्यांनी सांगितले. प्रियंका गांधी पुढे म्हणाल्या, बेरोजगारी आतापर्यंतच्या उच्चांकावर आहे आणि किंमती थांबण्याची चिन्हे नसताना वाढत आहेत.' भाजपला हे सोडवायचे नसून सर्वसामान्यांना त्यात अडकवायचे आहे.

# याची योग्य अंमलबजावणी करणे आवश्यक !

### न्यायालयाच्या निर्णयानंतर मायावतींची प्रतिक्रिया

**लखनौ:** बहुजन समाज पक्षाच्या प्रमुख आणि उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री मायावती यांनी उत्तर प्रदेश मदरसा कायद्याची घटनात्मकता कायम ठेवण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर प्रतिक्रिया दिली आहे. बसप प्रमुख सोशल मीडिया साइटवर लिहिले यामुळे यूपीमधील मदरसा शिक्षणावरून निर्माण झालेला वाद आणि हजारो मदरशांच्या अनिश्चिततेचा आता निश्चितच अंत होण्याची शक्यता आहे. याची योग्य अंमलबजावणी करणे महत्त्वाचे आहे. त्या म्हणाल्या की, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर आता विशेषतः उत्तर प्रदेशातील मदरशांना त्यांच्या सुरळीत कामकाजात मान्यता आणि स्थिरता मिळण्याची शक्यता आहे. न्यायालयाने म्हटले की, मदरसा कायद्यातील तरतुदी घटनात्मक मूल्यांशी सुसंगत आहेत आणि धार्मिक अल्पसंख्याकांच्या शैक्षणिक अधिकारांचे संरक्षण करतात. याशिवाय खासगी मालमत्तेशी संबंधित सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे मायावतींनी स्वागत केले आहे.

### मृतांच्या नातेवाईकांसाठी केंद्राकडून मदत जाहीर

**अल्मोडा :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तराखंडमधील अल्मोडा येथे झालेल्या भीषण रस्ता अपघातात ज्यांनी आपला जीव गमावला, त्यांचे कुटुंबिय आणि प्रियजनांप्रती शोक व्यक्त केला आहे. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेतील प्रत्येक मृतांच्या नातेवाईकांसाठी पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून २ लाख रुपयांची तर जखमींना प्रत्येकी ५०,००० रुपयांची मदत जाहीर केली आहे.

# एफटीआयआयच्या विद्यार्थ्याचा लघुपट ऑस्करच्या स्पर्धेत

**पुणे :** राष्ट्रीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेच्या विद्यार्थ्याला मोठा मान मिळाला आहे. चिदानंद नाईक या विद्यार्थ्याने दिग्दर्शित केलेला सनफ्लॉवर्स वेअर फर्स्ट वन्स टू नो हा लघुपट २०२५ मधील ऑस्कर पुरस्कारातील ठलाइव्ह ॲक्शन शॉर्ट फिल्म' या विभागासाठीच्या स्पर्धेत निवडला गेला आहे.

प्रतिष्ठेच्या कान महोत्सवात ल सेनेफ सिलेक्शन या विभागात सनफ्लॉवर्स वेअर फर्स्ट वन्स टू नो


### 'लाइव्ह ॲक्शन शॉर्ट फिल्म'

पहिल्या पारितोषिकाचा मानकरी ठरला होता. कन्नड भाषेत असलेला हा चित्रपट लोककथा आणि परंपरा यावर बेतला आहे. सूरज ठाकूर यांनी छायांकन, मनोज व्ही यांनी संकलन, अभिषेक कदम यांनी ध्वनि आरेखनाची जबाबदारी निभावली आहे. चिदानंद एफटीआयआयमध्ये शिकत असताना लघुपटाची निर्मिती करण्यात आली होती.

# एचएसआरपीसाठी पाचव्यांदा मुदतवाढ

### १ डिसेंबरपासून दंडात्मक कारवाई

**बेंगळूर :** एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी केलेल्या वाहनांना हायसिक्युरिटी रजिस्टेशन प्लेट (एचएसआरपी) बसविण्याची मुदत राज्य सरकारने सोमवारी पुन्हा एकदा



वाढविली आहे. त्यामुळे अद्याप एचएसआरपी नंबरप्लेट न बसविलेल्या वाहनधारकांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्य सरकारने यापूर्वी एचएसआरपीसाठी चारवेळा मुदत वाढविली तरी वाहन मालकांकडून नोंदणीसाठी म्हणावा तसा प्रतिसाद मिळालेला नाही. शिवाय नोंदणी केल्यानंतर अनेक महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर एचएसआरपी नंबरप्लेट उपलब्ध होत असल्याने नोंदणीकडे अनेकांनी दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे राज्य सरकारने पुन्हा एकदा मुदतवाढ दिली.

### मणिपूरमध्ये २.४ कोटींची बेकायदेशीर सुपारी जप्त

**इंफाळ :** आसाम रायफल्सने मणिपूरमधील चुराचंद्रपूर जिह्यातील खुगा गावात ३५० पोती बेकायदेशीर सुपारी जप्त केली आहे. या सुपारीची किंमत २.४ कोटी रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. सुपारीच्या तस्करीत सहभागी असलेल्या आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. संशयित आरोपींची अधिक चौकशी तपास यंत्रणांकडून केली जात आहे. मिझोरामच्या दिशेने जाणाऱ्या मालवाहू ट्रकची तपासणी केली जात असताना ही कारवाई करण्यात आल्याचे आसाम रायफल्सच्या अधिकाऱ्यांनी सोमवारी सांगितले.

# एलओसीजवळ हॉवित्झर तोफेची चाचणी

### ३० किमीपर्यंत तोफगोळे मारण्याची क्षमता

**कराची :** पाकिस्तानने जम्मू-काश्मीरमधील नियंत्रण रेषेजवळ (एलओसी) १५५ एमएम ट्रक-माउंट हॉवित्झर गन आणि इतर शस्त्रांची चाचणी केली आहे. मात्र ही चाचणी कधी झाली याबाबत अद्याप माहिती उपलब्ध नाही. १५५ एमएमची तोफ एका आखाती देशाच्या मदतीने चीनच्या संरक्षण कंपनीच्या देखरेखीखाली तयार करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली. १५५ एमएम तोफ ही एसएच-१५ हॉवित्झरची आवृत्ती असून ती त्याच्या शूट अँड स्कूट क्षमतेसाठी ओळखली जाते. हॉवित्झर १५५ एमएम तोफ अनेक प्रकारच्या शस्त्रांनी हल्ला करण्यास सक्षम आहे. ती ३० किमी अंतरापर्यंत हल्ला करू शकते आणि एका मिनिटात ६ शेल फायर करू शकते.



**बिजींग :** चीनने ९ पेक्षा अधिक देशांतील नागरिकांना मोठी भेट दिली आहे. दक्षिण कोरिया, नॉर्वे आणि फिनलंडसह नऊहून अधिक देशांचे नागरिक आता चीनमध्ये व्हिसामुक्त प्रवेशासाठी पात्र असतील. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की ८ नोव्हेंबरपासून या देशांतील नागरिकांना व्यापार, पर्यटन, कौटुंबिक भेटी किंवा ट्रांझिटसाठी १५ दिवसांसाठी व्हिसाशिवाय चीनमध्ये प्रवेश करण्याची परवानगी दिली जाईल.

# ९.७ कोटी मतदार बजावणार मतदानाचा हक्क

देशोन्नती वृत्तसंकलन

**पुणे :** विधानसभा निवडणुकीसाठी २८८ मतदारसंघातील सुमारे ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदारसंख्येत पुणे जिल्हा आघाडीवर आहे. रत्नागिरी, नंदुरबार, गोंदिया, भंडारा आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या पुरुष मतदारांच्या तुलनेत अधिक आहे.

पुण्यातील एकूण मतदारसंख्या ८८ लाख ४९ हजार ५९० आहे तर मुंबई उपनगरात ७६ लाख ८६ हजार ९८ मतदार आहेत. ठाण्यात ७२ लाख २९ हजार ३३९, नाशिक जिल्ह्यात ५० लाख ६१ हजार १८५ आणि नागपुरात ४५ लाख २५ हजार ९९७ मतदार आहेत. सिंधुदुर्गात एकूण मतदार ६ लाख ७८ हजार ९२८ असून यामध्ये ३ तृतीयपंथींची नोंद आहे. पुरुष मतदार ३ लाख ३६ हजार ९९१ आणि महिला मतदार ३ लाख ४१ हजार ९३४ आहेत.

### पाच जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या अधिक

रत्नागिरी, नंदुरबार, गोंदिया, भंडारा आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या पुरुषांपेक्षा अधिक आहे. रत्नागिरीतील एकूण मतदार संख्या १३ लाख ३९ हजार ६९७ असून यामध्ये ११ तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदार ६ लाख ४६ हजार १७६ आणि महिला मतदार ६ लाख ९३ हजार ५१० आहेत. नंदुरबारमध्ये एकूण मतदार १३ लाख २१ हजार ६४२ असून यामध्ये १३ तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदार ६ लाख ५४ हजार ४१२ आणि महिला मतदार ६ लाख ६७ हजार २१७ आहेत. गोंदिया जिल्ह्यात एकूण मतदार ११ लाख २५ हजार १०० असून यामध्ये १० तृतीयपंथींची नोंद आहे. यामध्ये पुरुष मतदार ५ लाख ५३ हजार ६८५ आणि महिला मतदार ५ लाख ७१ हजार ४०५ आहेत. भंडारा येथे एकूण मतदार १० लाख १६ हजार ८७० असून यामध्ये ४ तृतीयपंथींची नोंद आहे; पुरुष मतदार ५ लाख ६ हजार ९७४ आणि महिला मतदार ५ लाख ९ हजार ८९२ आहेत.

### पुण्यात सर्वाधिक मतदार



५ जिल्ह्यात ३० लाखांहून अधिक मतदार - अहमदनगर, सोलापूर, जळगाव, कोल्हापूर आणि औरंगाबाद या पाच जिल्ह्यांमध्ये ३० लाखांहून अधिक मतदार आहेत.

# नंदनकानन एक्सप्रेसवर अंदाधुंद गोळीबार!

**भुवनेश्वर :** रेल्वे ट्रॅक उखडून फेकणे, त्यावर मोठे दगड ठेवणे, तारांनी बांधून टाकणे आणि दगडफेकीसारख्या घटना तर आता सामान्य झाल्या आहेत. मात्र, आज सकाळी साडे नऊच्या सुमारास, ओदिशातील नंदनकानन एक्सप्रेसवर अंदाधुंद गोळीबार झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. प्रशासन, रेल्वे पोलिस आणि प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला असून, सुरक्षा दलाचे अधिकारी तपास करीत आहेत. रेल्वे सुरक्षा दलाचे जवान, या अनेक राऊंड

### प्रशासन सुन्न, प्रवाशांमध्ये घबराट




गोळीबाराच्या घटनेने स्तब्ध झाले असून, तपासाची चक्रे आता वेगाने फिरू लागली आहेत. आज सकाळी ९ वाजून २५ मिनिटांनी नंदनकानन एक्सप्रेस चरंपा रेल्वे स्टेशनकडे जात असताना, ही घटना रेल्वे प्रबंधकांच्या तक्रारीनंतर या प्रकरणी तपास सुरू झाला आहे. हा गोळीबार गार्डच्या व्हॅन डब्याकडे रोखून करण्यात आला होता. या ठिकाणी कोणत्याही प्रवाशाची बसण्याची जागा नसल्यामुळे कोणतीही जिवीतहानी किंवा कोणी जखमीही झालेले नाही. दरम्यान, या गोळीबारामागचे कारण नेमके काय होते, याविषयी पोलिस तपास करीत आहेत. याआधी, बिहार संपर्कक्रांती सुपरफास्ट रेल्वेगाडीत ठेवल्याची सूचना मिळाल्यानंतरही अशीच खळबळ उडाली होती.

# निसर्ग संपत्तीचा ऱ्हास, हिरवे डोंगर नष्ट

पर्यावरण

## उदासीन धोरणाचा फटका





परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहराच्या सभोवताली असलेले बालाघाटचे डोंगररांगा हे तर खरे तालुक्याला मिळालेले नैसर्गिक वरदानच म्हणता येईल. पावसाळ्यात डोंगरावर झालेले वृक्ष लागवड आणि हिरव्या वनराईने नटलेला डोंगर दऱ्यातील कप्पा न कप्पा डोळ्यांना नयनरम्य व सुखद अनुभव देतो.परंतु शासनाकडून या डोंगरांना सुरक्षित ठेवण्याची गरज असताना या डोंगर रांगांचे लचके तोडले जात आहेत. नैसर्गिक आणि गौनखनिज संपदेचा र्हास होत असताना दुसरीकडे मात्र या डोंगराचे सौंदर्य केवळ उद्याच्या इतिहासातच वाचनास व पाहावयास मिळेल. पुढील पिढीला डोंगर कसा असतो हे प्रत्यक्ष नाही तर फक्त छायाचित्रातून दाखवण्याची वेळ निश्चित येईल अशीविदारक परिस्थिती आहे. शहराच्या नजीकच्या विविध भागात डोंगर उत्खनन करून म्हणजेच मुरूम, आणि दगड ( डबर) काढण्याचे काम मोठ्या प्रमाणात चालू आहे. जेसीबी आणि पोकलेन यांचा वापर करून डोंगराचे लचके तोडले जात आहेत. आपण या बालाघाट च्या रांगांचे वैभव सांभाळले नाहीतर इतिहास,पुढील पिढी आपल्याला क्षमा करणार नाही.

परळी वैजनाथ शहराच्या चारही बाजूने असलेले बालाघाट डोंगर आपल्यासाठी मोठी निसर्गसंपदा आहे. परंतु मागील काही वर्षापासून डोंगराचे लचके तोडून आपला धंदा करण्यावर अनेकांनी भर दिला आहे. परिसरातील बरेंच डोंगर ही खाजगी मालमत्ता आहे. डोंगराच्या बाजू कापून येथे निवासासाठी समतल जागा बनवली जात आहे. आपल्या आरोग्यासाठी निसर्गसंपदा का जपू शकत नाही ? हाच खरा मोठा प्रश्न आहे.परळीतील श्री वैजनाथ मंदिर बालाघाट डोंगराच्या पायथ्याशी असून यासंदर्भातील मेरुगिरी प्रदक्षणा आजही भाविक वर्गात श्रध्येय आणि महत्व पूर्ण अशीच आहे. मेरू पर्वतावर एक मोठे उद्यानही असून सोबतच ग्रामीण पोलीस ठाणे याच डोंगरावर स्थापित आहे. परंतु एवढा मोठा इतिहास असूनही या डोंगरांना जेसीबी आणि पोकलेन ने खोदण्याचे काम युद्धपातळीवर चालू आहे. या डोंगरावर मोठी वनराई आहे. मेरू पर्वतावर एक मोठे उद्यानही असून सोबतच ग्रामीण पोलीस ठाणे याच डोंगरावर स्थापित आहे. याच डोंगराच्या पायथ्याशी काही अंतरावर वैद्यनाथ महाविद्यालय आहे. तर डोंगररांगेवर शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक भवन, शासकीय विश्रामगृह आणि लोकप्रतिनिधींची काही निवासस्थाने ही याच डोंगरावर उभी आहेत. वैद्यनाथ महाविद्यालयापासून थेट कनेरवाडी गावा पर्यंत आणि पुढे अंबाजोगाई नजीक पिंपळा धायगुडा व गिरवली परिसरातील बालाघाट डोंगराच्या रांगा मोठ्या प्रमाणात कापल्या जात आहेत. डोगराचे लचके तोडताना आपण निसर्ग संपत्तीचा आणि प्रामुख्याने पर्यावरणाचा ऱ्हास करीत आहोत याचे भान कोणालाही असल्याचे दिसून येत नाही. परळी शहरात मेरुगिरी च्या जवळ डोंगरावर वीरशैव समाजाने हजारो झाडे लावली आणि वाढवली. परंतु डोंगराच्या पायथ्याला उत्खनन चालू असल्याने या झाडांचे भविष्य अंधारात आहे. परळी शहरातील अनेक ज्येष्ठ नागरिक या डोंगरावर दररोज सकाळ- संध्याकाळ मोकळी आणि स्वच्छ हवेंत फेरफटका करण्यासाठी जातात. त्यांच्या डोळ्याला निसर्गाचा होत असलेला ऱ्हास पहावत नाही. शासनाने निसर्ग संपत्तीचे जतन करण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. राजकीय पक्ष आणि पर्यावरणवादी संघटनांनी किमान गावानजीकच्या डोंगर पट्ट्यात उत्खनन करू नयेत याचा पान २ वर...

### विलासरावांनी केले होते कौतुक

परळी येथील तहसील कार्यालयाच्या इमारतीच्या उद्घाटनासाठी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव जी देशमुख आले होते यावेळी आपल्या भाषणात बोलताना विलासराव देशमुख म्हणाले की गोपीनाथराव तुम्ही डोंगरावर रेस्ट हाऊस बांधले हे खूप छान. आम्ही असे रेस्ट हाऊस काही बांधू शकलो नाहीत. कारण आमच्याकडे डोंगर नाहींत, आणि ते मागताही येत नाहीत.तुम्ही नशीबवान आहात तुम्हाला डोंगर-दऱ्या आहेत.ही निसर्गाची संपदा तुम्ही जपा असाही सल्ला त्यांनी दिला होता.

प्रभू वैद्यनाथ ज्योतीर्लिंग परळी परीसरातील डोंगर माथ्यावरील नैसर्गिक संवर्धन करणे ही सर्वांचीच जबाबदारी असून डोंगर माथ्यावरील होत असलेल्या बेकायदा उत्खननावर महसुल व गौण खनिज प्रशासनाच्यावतीने कार्यवाही होणे गरजेचे आहे.

-चेतन सौंदळे नगरसेवक,परळी

बालाघाटच्या डोंगरावर जे अवैध उत्खनन चालू आहे. त्यामुळे दुर्मीळ जैवविवीधतेचा ऱ्हास होत चालला आहे. याच डोंगरावर अनेक दुर्मीळ वनस्पती सापडतात त्यावर संशोधन होण्याची गरज आहे.शासनाचा भूगर्भ विभाग,पर्यावरण विभाग यांची परवानगी न घेताच हे उत्खनन गेल्या अनेक वर्षांपासून चालू आहे.

-श्रीकांत पाथरकर

## मुंदडाच्या भुरट्या पुढाऱ्यांनो रस्ता कधी?

### चर्चा:आ.नमीता लोखंडेला घरी बसवा



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी सर्कल मधील व चिंचोली माळी येथील आमदारा नमीता लोखंडे यांच्या भुरट्या पुढाऱ्यांना प्रचार करताना दीसुन येत आहेत लोकांचे उंबरठा जिजवत आहेत परंतु आमदारा नमीता लोखंडे व सासऱ्यांने सांभाळलेल्या चिंचोली माळी येथील भुरट्या पुढाऱ्यांना गावचा रस्ता दीसत नाही का मते मागण्यासाठी येताना जनाची नव्हे तर मनाची तरी बाळगून मते मागण्यासाठी याव कारण आमदारा नमीता लोखंडे यांनी चिंचोली माळी ते हादगाव रोड मंजूर असून सुद्धा काम केले नाही व भुरटे पुढारी मत मागायला येत आहेत तसेच आमदारा नमीता लोखंडे यांनी व चिंचोली माळी येथे सांभाळलेल्या भुरट्या पुढाऱ्यांनी नेहमी गावावर अन्याय केला आहे तसेच चिंचोली माळी येथील गावाला विकासा पासुन वंचित ठेवणाऱ्या आमदारा नमीता लोखंडे आहेत कारण चिंचोली माळी ग्रामपंचायत अंतर्गत एखादे विकास काम होणार असेल तर काम अडविण्यासाठी आमदारा नमीता लोखंडे यांनी अनेक तक्रारी केल्या आहेत म्हणून आमदारा नमीता लोखंडे यांनी चिंचोली माळी येथील विकास केला नाही म्हणून चिंचोली माळी येथील जनता जनार्दन या निवडणुकीत आमदारा नमीता लोखंडे यांना जागा दाखवून देनार आहेत असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

## पक्षादेश डावलणाऱ्याची हकालपट्टी

### निर्णय:सय्यद याकूब यांच्या विरोधात कारवाई

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी


मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या(माकप) महाराष्ट्र राज्य कमिटी व बीड जिल्हा कमिटीच्या निर्णयाला न जुमानता वैयक्तिक महत्वाकांक्षेपोटी माजलगाव येथील पक्ष कार्यकर्ते सय्यद याकूब हे पक्षाच्या निर्णयाविरुद्ध बंडखोरी करून माजलगाव विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून उभे आहेत. पक्ष शिस्तीचा भंग केल्यामुळे सय्यद याकूब यांची मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षातून तत्काळ हकालपट्टी करण्यात आली आहे. पक्षाच्या राज्य सचिव मंडळाने हकालपट्टीच्या या निर्णयाला मान्यता दिलेली आहे.

भाजपच्या नेतृत्वाखालील धर्मांध महायुतीला फायदा होऊ नये या भूमिकेतून, मत विभाजन टाळण्यासाठी माजलगाव विधानसभेची जागा सद्य परिस्थितीत न लढवण्याचा निर्णय माकपने घेतला. मात्र तरीही पक्षाबाहेरील लोकांच्या प्रभावाखाली येऊन, त्यांच्या सल्ल्याने सय्यद याकूब हे पक्षाचा निर्णय न मानता निवडणुकीसाठी उभे आहेत. त्यामुळे पक्षाने सय्यद याकूब यांच्यावर ही कारवाई केली आहे. तसेच पक्षात दाखल होण्याच्या प्रक्रियेत असणारे जगदीश फरताडे यांच्यावर देखील याच कारणामुळे कारवाई करण्यात आली आहे.मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सर्व कार्यकर्ते व समर्थक यांना वरील संबंधितांशी कुठल्याही प्रकारचे राजकीय संबंध न ठेवता, महाविकास आघाडीच्याच उमेदवाराचा प्रचार या विधानसभा निवडणुकीत करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत. सय्यद याकूब यांना निवडणुकीत प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष अशी कुठलीही मदत करताना पक्ष कार्यकर्ते आढळून आल्यास हा पक्ष शिस्तीचा भंग समजण्यात येईल व त्यांच्यावर तत्काळ शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

पक्षाचे महाराष्ट्र राज्य सचिव कॉ.उदय नारकर, राज्य सचिवमंडळ सदस्य डॉ. अजित नवले, कॉ.विजय गाभने यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतीच पक्षाच्या बीड जिल्हा कमिटीची ऑनलाईन बैठक पार पडली. त्यात हे निर्णय घेण्यात आले. सय्यद याकूब यांनी यापूर्वी देखील पक्षाशी काहीही चर्चा न करता निवडणुकीतील स्वतःच्या उमेदवारी बाबत परस्परच मेळावा घेतला होता. तसेच फेसबुक, व्हाट्सअप इत्यादी समाज माध्यमातून पक्षाविषयी गैरसमज निर्माण करणारे मेसेज पाठवणे, पक्षाच्या निर्णयाविरुद्ध जाहीररीत्या टीका करणे, हे प्रकार पान २ वर...

## मातंग समाजाचा एकता मेळावा

### अनिल कांबळे :उपस्थित राहण्याचे आवाहन



माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

शहरात मातंग समाजाची एकजुट करून वज्रमुठ आवळण्यासाठी मातंग समाज एकता मेळाव्याचे आयोजन दि. ७ नोव्हेंबर २०२४ रोजी करण्यात आले आहे. यावेळी मोटारसायकल व कार रॅलीचे आयोजन देखिल करण्यात आले आहे. यामध्ये समाजबांधवांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक तथा समाजसेवक अनिल राधे कांबळे यांनी केले आहे.

शहरातील वैष्णवी मंगल कार्यालयात दि. ७ नोव्हेंबरला सकाळी १०.३० वाजता मातंग समाज एकता मेळावा होणार असुन त्यापूर्वी मोटारसायकल रॅली व कार रॅली काढण्यात येणार आहे. या रॅलीची सुरूवात ब्रम्हगाव येथील साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाउ साठे चौकांपासुन ते शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकांपर्यंत काढण्यात येणार आहे. या मातंग समाज एकता मेळाव्यात आगामी विधानसभा निवडणुकीत समाजाची दिशा ठरविण्यासाठी व कोणत्या उमेदवारास पाठींबा द्यायचा याबाबत निर्णय घेण्यात येणार असुन समाजाचे विवीध प्रश्न, समस्यांबाबत देखिल चर्चा करण्यात येणार आहे. या रॅलीमध्ये व एकता मेळाव्यास समाजबांधवांनी हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन उपसरपंच तथा समाजसेवक आयोजक अनिलराधे कांबळे यांनी केले आहे.

## वर्गमित्रांच्या आठवणींचा वर्ग पून्हा भरला

### ऋणानुबंध:कर्मवीर विद्यालयातील वर्गमित्रांची भेट



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे असणाऱ्या कर्मवीर विद्यालयातील वर्गमित्र मैत्रिणी २००६ साली असलेल्या दहावी वर्गातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी एकत्र येत गेट-टुगेदर कार्यक्रमाच्या माध्यमातून जुन्या आठवणींना उजाळा देत ५ नोव्हेंबर रोजी ज्या शाळेत शिक्षणाचे धडे गिरवले त्या शाळेला भेट देणे सध्या आपण काय करत आहोत कुठल्या क्षेत्रात आहोत याबाबत विचारात्मक चर्चासत्र पूर्ण करत स्नेहभोजनानंतर कार्यक्रम संपन्न झाला. वर्गमित्रांचे स्नेह मेळावे केज शहरात अनेक वेळा दिवाळी सणाच्या दरम्यान साजरे होत आहेत. यामध्ये २००६ या शैक्षणिक वर्षात केज तालुक्यातील नावाजलेल्या चिंचोली माळी येथील कर्मवीर विद्यालयातील दहावी वर्गातील विद्यार्थी विद्यार्थिनींनी स्नेह मिलन सोहळावेचे आयोजन केले होते. या स्नेह मिलन सोळाव्यात विद्यार्थ्यांनी एकत्र येत ज्या शाळेत शिक्षणाचे धडे गिरवले त्या शाळेला भेट देणे तसेच सध्या आपण ज्या क्षेत्रात कार्यरत आहोत त्या क्षेत्राची माहिती एकमेकांना पान २ वर...

## आपली निष्ठा निरर्थक जाणार नाही

### दखल:शरद पवार यांनी राजेभाऊ फडांना लिहिले पत्र



परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार यांनी युवक नेते राजेभाऊ फड यांना पत्र पाठवून आपल्या भावना कळवल्या आहेत. परळी विधानसभा मतदारसंघात आपण घेतलेली मेहनत आणि कष्टाला निरर्थक जाऊ देणार नाही. तुम्ही केलेल्या कामाची पक्षाने नोंद घेतली असून आपल्याला भविष्यात योग्य न्याय दिला जाईल असा शब्द त्यांनी युवक नेते राजेभाऊ फड यांना दिला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरदचंद्र पवार यांनी युवक नेते राजेभाऊ फड यांना नुकतेच पत्र लिहिले आहे. या पत्रात त्यांनी राजेभाऊ फड यांचे कौतुक केले असून, पक्षाचे मतविभाजन होऊ नये यासाठी त्यांनी घेतलेली माघार अभिनंदनीय असल्याचे म्हटले आहे. इच्छुक उमेदवार संख्या जास्त असल्याने त्यातून उमेदवार देत असताना मानाची घालमेल होत असून, आपण पक्षासाठी केलेलं काम आणि पक्षाप्रती असलेली निष्ठा निरर्थक जाऊ देणार नसल्याचा शब्द त्यांनी दिला आहे. यात त्यांनी पुढे म्हटले आहे की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा आपल्यासारख्या कार्यकर्त्यांच्या बळावर मोठा झालेला पक्ष आहे. जनकल्यानाचे ध्येय पूर्ण करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कामाला लागायचे असून आपल्या कामाची आणि आपल्या पक्षाप्रती असलेल्या निष्ठेची आम्ही नोंद घेतली असल्याचेही शरदचंद्र पवार यांनी लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.

## चळवळीच्या कार्याची घेतली दखल!

### निवड: विशाल मस्के रिपाइं पाटोदा तालुकाध्यक्षपदी



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

रिपाइंच्या माध्यमातून विविध आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवून अनेक वर्षापासून सामाजिक चळवळीत काम करणारे, पाटोदा तालुक्यातील सौताडा येथील रहिवाशी विशाल मार्कस म्हस्के यांची बुधावर (दि.६) रोजी युवा रिपाइं प्रदेश अध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या प्रमुख उपस्थितीत युवा रिपाइंच्या पाटोदा तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली. रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचे हात बळकट करण्यासाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली पाटोदा तालुक्यातील गावा-गावांमध्ये रिपाइं शाखांची स्थापना पान २ वर...

पडघम

## अनिल जगतापांच्या विजयासाठी आवडली वज्रमुठ

# क्षीरसागरांनी ४० वर्षात काय दिवे लावले?



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेल्या चाळीस वर्षांपासून बीड विकासाचा खेळखंडोबा करणाऱ्या लबाड क्षीरसागरांना धडा शिकवायचा असेल तर आता अठरा पगड जाती-धर्मातील माणसांची एकजूट होणे गरजेचे आहे. आलटून-पालटून क्षीरसागरांचे नवनवीन चेहरे समोर येतात, विकास पुरुष म्हणून स्वतःची ब्रँडिंग करतात आणि सामान्य जनतेला लुटत राहतात. सत्ता स्वतः च्या घरात टिकवून ठेवण्यासाठी क्षीरसागर आपापसात भांडण्याचे नाटकं करून बीडकरांची दिशाभूल करतात. मात्र लक्षात ठेवा हे सगळे क्षीरसागर एकच आहेत. आजवर जे झालं ते झालं पण आता ही वेळ क्रांतीची आणि परिवर्तनाची आहे. बीडवासियांचे मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी, बीड विकसाचा कायापालट करण्यासाठी एकजुटीने कामाला लागा. असे आवाहन बीड विधानसभा अपक्ष उमेदवार मा. अनिलदादा जगताप यांनी आपल्या समर्थक आणि कार्यकर्त्यांना केले.

काल दि. ५ नोव्हेंबर रोजी दुपारच्या सुमारास मराठा संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील समर्थक, मराठा सेवक तसेच सर्व जाती-धर्मातील अनिलदादांच्या समर्थकांनी मिळून बीड शहरातील जालना रोड वरील अनिलदादा जगताप मध्यवर्ती कार्यालय येथे विधानसभा पूर्व नियोजन तथा निश्चय बैठकीचे आयोजन केले होते. याप्रसंगी अनिलदादा जगताप यांनी उपस्थित राहून सर्वांशी मुक्त संवाद साधत पुढील दिशा, ध्येयधोरण यावर सविस्तर चर्चा केली. बैठकीचे प्रास्ताविक प्रतिक कांबळेयांनी केले तर गणेश मस्के, संदीपान बडगे, साहेबराव पोपळे, मधुकर शिंदे महाराज, मुकेश रसाळ, किशोर गिराम, प्रदीप माने, संतोष जाधव, सुनिल सुरवसे, महादेव रकटे, प्रकाश खांडे सर, पप्पूजी बरीदे या सर्वांनी मिळून अनिलदादांना विजयाचे समीकरण जुळवून आणण्यासाठी शहर-गावखेड्यात कोणत्या योजना/यंत्रणा राबविणे अत्यावश्यक आहे यांसदर्भात मार्गदर्शन सूचना केल्या तसेच अनिलदादा केवळ तुम्हीच पान २ वर...

## राजरत्न आंबेडकरांसाठी घेणार सभा

### पडघम:मनोज जरांगे यांनी दिला शब्द



वाशीम/पुण्यभूमी प्रतिनिधी

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजरत्न आंबेडकर यांच्या प्रचारासाठी वाशिम विधानसभा मतदारसंघात मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील जाहीर प्रचार सभा घेणार आहेत. त्यामुळे वाशिम मंगरुळपीर मतदार संघातून मराठा समाजाची मते राजरत्न आंबेडकर यांना मिळणार आहेत.३४ वाशिम मंगरुळपीर विधानसभा मतदारसंघातून राजरत्न आंबेडकर निवडणूक लढवित आहेत.मनोज जरांगे यांनी विधानसभा निवडणुकीतून माघार घेतली आहे.ज्याला निवडून आणायचे त्याला आणा आणि ज्याला पाडायचे त्याला पाडा अशी भूमिका त्यांनी घेतली आहे.

दरम्यान मनोज दादा जरांगे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की,मराठा समाजाचा आंबेडकर यांना वाशिम मध्ये पाठिंबा राहील तसेच त्यांच्या साठी मी जाहीर सभाही घेणार आहे. तसेच मौलाना सज्जाद साहेब नोमानी यांचाही त्यांना पाठिंबा आहे. त्यामुळे राजरत्न आंबेडकर यांचा विजय निश्चित मानला जात आहे.